❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २३१ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews




दैनिक **संध्या** नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

"तीन रंगांत रंगलेला तिरंगा,
हीच आमच्या देशाची शान!"

स्वातंत्र्यदिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा...!

---

दैनिक **संध्या**

शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६

"स्वातंत्र्य दिनानिमित्त"

दै. संध्या कार्यालयाला सुट्टी असल्याने रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

\- संपादिका

# शिवसेना एकनाथ शिंदेंचीच

## २०२४च्या विधानसभा निकालाने लोकन्यायालयाचे शिक्कामोर्तब



### सुप्रीम कोर्टही हाच निर्णय देईल असा विश्वास : फडणवीस

### राज ठाकरेंसारखी वेगळी चूल मांडायला हवी होती

मुख्यमंत्र्यांच्या या दाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. त्या म्हणाल्या, "शिवसेना ही कालही, आजही आणि उद्याही उद्धव ठाकरे यांचीच असणार आहे. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस ही कालही, आजही आणि उद्याही शरद पवारांचीच असेल. जर कोणाचे मत वेगळे असेल, तर त्यांनी राज ठाकरे यांच्यासारखी स्वतःची वेगळी चूल मांडायला हवी होती. स्वतःच्या हिमतीवर नवीन पक्ष निर्माण केला असता, तर सर्वांनी त्यांचे कौतुकच केले असते."

■ जालना (दै. संध्या)

सध्या सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्हावर अत्यंत महत्त्वाची सुनावणी सुरू आहे. गुरुवारी ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केल्यानंतर, आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर मोठी प्रतिक्रिया दिली आहे. "सर्वोच्च न्यायालय यावर आपला निर्णय देईलच, मात्र त्यापूर्वीच 2024च्या विधानसभा निवडणुकीत 'लोकन्यायालयाने' शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच असण्यावर शिक्कामोर्तब केले आहे," असे ठाम मत मुख्यमंत्री फडणवीस यांनी जालना येथे माध्यमांशी संवाद साधताना व्यक्त केले. या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्र्यांनी शिवसेना पक्षनाव, राहुल गांधींवर टीका, चाकण एमआयडीसीचा प्रश्न आणि जातनिहाय जनगणना अशा विविध मुद्द्यांवर सविस्तर भाष्य केले. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "हे संपूर्ण प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयाच्या विचाराधीन आहे आणि न्यायालय त्यावर योग्य तो निर्णय देईल. पण त्यापूर्वीच या राज्याच्या लोकन्यायालयाने 2024च्या विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून आपला निर्णय दिला आहे. शिवसेना ही सन्माननीय एकनाथराव शिंदे यांची आणि राष्ट्रवादी काँग्रेस ही अजितदादा पवार यांचीच आहे, यावर जनतेने शिक्कामोर्तब केले आहे. आता सुप्रीम कोर्ट काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष असले, तरी सुप्रीम कोर्टदेखील हाच निर्णय देईल अशी आम्हाला पूर्ण अपेक्षा आहे." लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अत्यंत शेलक्या शब्दांत टीका केली. "राहुल गांधी यांनी जो 'छिचोरपणा' केला, तो कुठल्याही परिस्थितीत अशोभनीय आहे. अशा प्रकारचा छिचोरा नेता भारताने यापूर्वी कधीही पाहिला नव्हता. त्यांनी केवळ देशाच्या पंतप्रधानांचाच अपमान केला नाही, तर इटलीच्या महिला राष्ट्रप्रमुखाचाही अत्यंत खालच्या दर्जाला जाऊन अपमान केला आहे. गल्लीतले नेतेदेखील अशा पद्धतीने वागत नाहीत." राहुल गांधी आणि संदीप दीक्षित यांनी या कृत्याबद्दल संपूर्ण देशाची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी फडणवीस यांनी केली. शरद पवार यांनी चाकण औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांच्या स्थलांतरावरून आणि महाराष्ट्रातील 36 हजार कंपन्या बंद पडल्याच्या मुद्द्यावरून सरकारवर टीका केली होती. यावर फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले, "पवार साहेब हे ज्येष्ठ नेते आहेत आणि ते नेहमी महाराष्ट्रहिताचा विचार करतात. त्यांच्यापर्यंत चुकीची माहिती जाऊ नये म्हणूनच मी 'एक्स'वर (ट्विटर) सविस्तर उत्तर दिले आहे. देशात सर्वाधिक आणि सक्रिय कंपन्या आजही महाराष्ट्रातच आहेत. ज्या कंपन्या कधी सुरूच होऊ शकल्या नाहीत, त्यांचा आकडा देऊन काही लोक फसवेगिरी करत आहेत." अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जातनिहाय जनगणनेबाबत मुख्यमंत्र्यांनी मोठी माहिती दिली. ते म्हणाले, "केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना घोषित केली असून, त्याची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. आता या माहितीची नोंद भरली जाईल.

> "चाकणचा विषय निश्चितपणे गंभीर आहे आणि आम्ही तो गांभीर्याने घेतला आहे. तिथे 5 ते 7 वेगवेगळ्या यंत्रणा असल्याने समन्वयाचा अभाव होता. त्यामुळे आता जिल्हाधिकाऱ्यांना प्रमुख (वाली) करून सर्व यंत्रणांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न सुरू आहे, जेणेकरून तिथल्या समस्या लवकर दूर होतील."

# पार्थ पवारांकडून झिशान सिद्दिकी यांना पुन्हा मोठी संधी

### वरिष्ठांचा विरोध डावलत सिद्दिकींकडे मुंबई अध्यक्षपद? सूत्रांची माहिती



■ मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेसमधील वरिष्ठ नेत्यांचा विरोध डावलत पार्थ पवारांकडून झिशान सिद्दिकी यांना पुन्हा मोठी संधी दिली जाण्याची शक्यता आहे. झिशान सिद्दिकी यांना विधानपरिषदेची आमदारकी दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसकडून मुंबई अध्यक्षपदाची जबाबदारी देखील दिली जाण्याची शक्यता आहे. पार्थ पवार यांच्याकडून झिशान सिद्दिकी यांना मुंबई अध्यक्षपदावर संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मुंबई अध्यक्षपद दोन वर्षांपासून रिक्त आहे. समीर भुजबळ यांनी मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर ते पद रिक्त होतं. झिशान सिद्दिकी यांना अध्यक्षपद मिळाल्यास मुंबई राष्ट्रवादीत नाराजी नाट्य रंगण्याची शक्यता आहे.

समीर भुजबळ यांनी मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर मागील २ वर्षांपासून मुंबई अध्यक्षपद रिक्त आहे. पार्थ पवारांकडून आपल्या विचाराचा युवक अध्यक्ष, युवती अध्यक्ष आणि विद्यार्थी राष्ट्रीय अध्यक्ष निवडल्यानंतर आता मुंबई अध्यक्ष नेमण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून देण्यात आली आहे.

झिशान सिद्दिकी यांना आमदारकी पार्थ पवार यांच्या मागणीवरुन देण्यात आली होती. आता मुंबई अध्यक्षपद सिद्दिकी यांना देण्याबाबत हालचाली सुरु असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये मुंबईत दोन कार्याध्यक्ष नेमण्यात आले आहेत. त्यापैकी एकाला अध्यक्षपदी नेमण्यात यावं, अशी मागणी होती. ती मागणी डावलत खासदार पार्थ पवार यांच्याकडून झिशान सिद्दिकी यांच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ घालण्याचा प्रयत्न होतोय त्यामुळं हा संघर्ष वाढताना दिसण्याची शक्यता आहे. झिशान सिद्दिकी यांना विधानपरिषदेची आमदारकी देताना पक्षातील मोठ्या नेत्यांनी विरोध केला होता. झिशान सिद्दिकी पक्षात नवे आहेत, याशिवाय विधानसभेला ते निवडून आले नव्हते.त्यामुळं सिद्दिकी यांना विधानपरिषद का द्यायची असा सवाल त्यावेळी उपस्थित करण्यात आला होता. आता पुन्हा एकदा झिशान सिद्दिकी यांना प्राधान्य का दिले जातोय, असा सवाल मुंबई राष्ट्रवादीमध्ये निर्माण होत आहे. त्यामुळं आगामी काळात मुंबई राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय घडामोडींकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

राज्यसभेचे खासदार पार्थ पवार यांचा पक्षातील निर्णयांवर प्रभाव असल्याचं गेल्या काही दिवसांमधील घडामोडींवरुन दिसून येत आहे. विधानपरिषदेच्या पुणे स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीत विक्रम काकडे यांना उमेदवारी दिली होती. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील संघटनात्मक नियुक्त्यांवर पार्थ पवार यांचं वर्चस्व असल्याचं दिसून आलं होतं. पार्थ पवार यांच्या विचाराचे युवक अध्यक्ष, युवती अध्यक्ष आणि विद्यार्थी राष्ट्रीय अध्यक्ष यांची काही दिवसांपूर्वी निवड करण्यात आली होती. युवती अध्यक्ष म्हणून निर्मला नवले आणि विद्यार्थी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून आकाश झांबरे पाटील यांची निवड करण्यात आली होती.

## संध्या प्रहार




## थोडक्यात...

### बर्गर किंगवर मोठी कारवाई; परवाना रद्द!

पुणे : दैनिक संध्या

राज्यभर धडाकेबाज कारवाई करणाऱ्या तुकाराम मुंढे यांच्या एफडीएने आता पुण्यामध्ये मोठी कारवाई केली आहे. पुण्यातील कँप परिसरातील बर्गर किंगमध्ये अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या गंभीर त्रुटी आढळून आल्यामुळे त्याचा परवाना रद्द करण्यात आला आहे. दररोज हजारो खवय्यांची तुफान गर्दी होणाऱ्या या आऊटलेटवर थेट परवाना रद्द करण्याची कारवाई झाल्याने पुणेकर खवय्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. मुंबईत डॉमिनोज पिझ्झावर धडक कारवाई केल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने आता आपला मोर्चा पुण्यातील प्रसिद्ध फूड जॉईंट्सकडे वळवला आहे. पुण्यातील कँप परिसरात असलेल्या अत्यंत सुप्रसिद्ध 'बर्गर किंग'वर एफडीएने अचानक छापेमारी करत शाखेचा अन्न परवाना जागेवरच रद्द केला आहे. एफडीएच्या अधिकाऱ्यांनी कँप येथील बर्गर किंग आऊटलेटला अचानक भेट देऊन पाहणी केली असता, तेथे अन्नसुरक्षा आणि गुणवत्तेसंदर्भात अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या. प्रचंड अस्वच्छता : किचन आणि अन्न साठवणुकीच्या जागी भीषण अस्वच्छता आढळली, जे कारवाईचे प्रमुख कारण ठरले. अन्न मानकांचे उल्लंघन : खाद्यपदार्थ तयार करताना आणि साठवताना एफडीएच्या नियमावलीचे स्पष्ट उल्लंघन होत असल्याचे समोर आले. आरोग्यास धोका : ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याने प्रशासनाने कोणताही विलंब न करता तात्काळ परवाना रद्द करण्याचा निर्णय घेतला. मुंबईत डॉमिनोज, मॅकडॉनल्ड्स आणि बर्गर किंगच्या विविध आऊटलेट्सवर धाडी टाकल्यानंतर एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम आता राज्यभर तीव्र करण्यात आली आहे. पुण्यातील इतरही प्रसिद्ध हॉटेल्स आणि फास्ट-फूड आऊटलेट्स एफडीएच्या रडारवर असून, स्वच्छता आणि अन्नसुरक्षेबाबत निष्काळजीपणा आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा कडक इशारा प्रशासनाने दिला आहे.

# तुमच्या ताटात काय वाढून ठेवलंय ते बघा

## सुप्रियाताई आपलं ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याच बघायचं वाकून : वाघमारे कडाडल्या

■ मुंबई (दै. संध्या)

शिवसेना ही ठाकरेंची आहे. शिवसेना यापूर्वी ठाकरेंचीच होती, आजही आहे उद्याही राहील, असे मोठे वक्तव्य राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यावर शिवसेना शिंदे गटाच्या खासदार ज्योती वाघमारे यांनी पलटवार केला आहे. शिवसेना कोणाची यावर सुप्रिया सुळेंनी बोलणं म्हणजे आपलं ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याच बघायचं वाकून म्हणतात. आपला पक्ष सांभाळता येतं नाही आणि लोकांना शहाणपणा शिकवता? असा सवाल करत वाघमारेंनी सुळेंवर जोरदार हल्लाबोल चढवला.



सुप्रिया ताई सोन्याचा चमचा घेऊन तुम्हीच जन्माला आलात. खासदार आमदार सगळं तुम्हाला आयतं मिळालं आहे. तुमचं स्वतःच कर्तृत्व काय आहे? असा सवाल वाघमारेंनी उपस्थित केला. लोकांनी जनमत देऊन शिवसेना ही एकनाथ शिंदेकडे सुरक्षित असल्याचे सांगितल्याचे वाघमारे म्हणाल्या. सुप्रिया ताई तुम्ही सुद्धा लाडकी लेक योजनेच्या लाभार्थी आहात अशी टीका वाघमारेंनी केली. तुमच्या सारख्या घराणेशाहीतून आलेले लोक घराणेशाईचे समर्थन करतात. शिवसेना एकनाथ शिंदे साहेबांची हे महाराष्ट्रने मान्य केल्याचे वाघमारे म्हणाल्या. शिवसेना कोणाची याचा निर्णय निवडणूक आयोगाने दिला आहे. विधानसभेच्या सभापतींनी दिला आहे. तसेच जनतेच्या न्यायालयाने देखील दिला असल्याचे ज्योती वाघमारे म्हणाल्या. बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली सुरक्षीत असल्याचे मत वाघमारे यांनी व्यक्त केले.

### एकनाथ शिंदेंनी स्वत:चं नेतृत्व स्वत:च्या कर्तृत्वाने उभं केलंय

सुप्रियाताई शरद पवार साहेबांसारख्या मोठ्या नेत्याची कन्या म्हणून तुम्ही सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आला. खासदार, आमदार सगळं तुम्हाला आयतं मिळालं,तुमचं स्वतःच कर्तृत्व काय आहे? पण एकनाथ शिंदेंनी स्वत:चं नेतृत्व स्वत:च्या कर्तृत्वाने उभं केलं आहे. शिवसेना कोणाची याचा निर्णय निवडणूक आयोगाने, विधानसभा अध्यक्षांनी आणि सर्वात महत्त्वाचं जनतेच्या न्यायालयाने सुद्धा दिला असल्याचे ज्योती वाघमारे म्हणाले. तुमच्यासारख्या घराणेशाहीतून आलेली माणसं घराणेशाहीचेच समर्थन करतात. पण याद राखा हा देश घराणेशाहीवर चालत नाही, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानवर आणि लोकशाहीवर चालतो. शिवसेना एकनाथ शिंदे साहेबांचीच हे महाराष्ट्रने मान्य केलं आहे. सुप्रियाताई तुम्ही तुमच्या घरात काय जळतंय, तुमच्या ताटात काय वाढून ठेवलंय ते बघावं अशी टीका ज्योती वाघमारेंनी केली.




**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट**

'गणपती भवन', २५०, बुधवार पेठ, पुणे २, फोनः २४४७९२२२ ● गणपती सदन, १३२, बुधवार पेठ, पुणे २, फोनः २४४९२०००
Visit us at: www.dagdushethganpati.com, E-mail: contact.dhgt@gmail.com

**राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा बक्षिस समारंभ** (पुणे मनपा क्षेत्र)

**मा.ना.गिरीश महाजन**, जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते आणि **मा.सौ.मंजुषाताई नागपुरे**, महापौर पुणे, **मा.संजय दराडे**, पोलीस सह आयुक्त, पुणे, **मा.उल्हासदादा पवार**, ज्येष्ठ नेते यांचे प्रमुख उपस्थितीत होत आहे.


मा.ना. गिरीश महाजन

**या कार्यक्रमास सर्व गणेश मंडळाचे कार्यकर्ते, गणेश भक्तांनी उपस्थित रहावे अशी विनंती.**


**स्थळ: गणेश कला-क्रिडा रंगमंच, स्वारगेट, पुणे ● उद्या रविवार दि. १६ ऑगस्ट २०२६, सायं. ५.४५ वा.**


मा.सौ.मंजुषाताई नागपुरे


मा.संजय दराडे

राष्ट्रीय गणेशोत्सव पारितोषिक स्पर्धा २०२६ फॉर्म वाटपः **दि. १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२६** पर्यंत २५०, बुधवार पेठ, 'गणपती भवन', ऑफीसमध्ये स. १० ते सायं. ६ व एस.टी.डी. बुथ येथे सकाळी ८ ते रात्रौ १० या वेळेत मिळतील. फॉर्मची किंमतः रुपये ५०/-.
फॉर्म स्विकारण्याची अंतीम मुदतः **दि. १५.०९.२०२६.** नियमांनुसार आपला फॉर्म वर निर्देशीत केलेल्या ठिकाणी भरुन दिल्यानंतरच स्पर्धेसाठी ग्राह्य धरला जाईल.

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे ▌ सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे**



# संपादकीय

## अराजकाशी दोन हात

भारतात सरकारकडे एवढी प्रचंड शासनक्षमता आहे, की तिचा पूर्ण वापर करण्याची वेळ क्वचितच येते. इथलं सामाजिक, राजकीय वातावरणही विवेकी, परिपक्व आहे. लोकशाही शासन व्यवस्था इथे अंगवळणी पडली आहे. इस्लामी देशांसारखा सत्तेच्या पाशवी बळाचा वापर करावा लागत नाही. केंद्र सरकारला घटनादत्त अधिकारांचं मोठं वरदान आहेच; त्यात सरकार नुसतं स्थिर नाही, चांगलं भरभक्कम आहे. देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रभावाखालीच आहे. ज्यापक्षाची नोंदणी नाही, पदाधिकारी-कार्यकारिणी नाही, देशात कुठे कार्यालय नाही- असा पक्ष दिल्लीत 'जंतरमंतर'सारख्या ठिकाणी ३७ दिवस सलग आंदोलन करतो; कुठलाही परिचित चेहरा नेता म्हणून नसताना देशभरातून विद्यार्थ्यांचे लोंढेच्या लोंढे दिल्लीला धडकू लागतात, देशातल्या असंख्य शहरांमध्ये विद्यार्थी कोणत्याही प्रस्थापित राजकीय पक्षाच्या पाठिंबा किंवा पुढाकाराशिवाय रोज रस्त्यावर येऊ लागतात, तेव्हा त्या वातावरणाची दखल कोणत्याही, कितीही शक्तिशाली सरकारला घ्यावीच लागते. केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार जनमताविषयी विशेष संवेदनशील असल्याने त्यांना या असंतोषाचा अर्थ, त्यातली ताकद नेमकी समजली. त्यांनी आंदोलकांच्या तिन्ही मागण्या मान्य केल्या. आंदोलन संपलं. विद्यार्थी घरोघरी गेले. हातून निसटून चाललेल्या वातावरणावर केंद्र सरकारने शेवटच्या दोन दिवसांत चांगली पकड मिळवली. हे वातावरण आणखी काही काळ असंच ठेवण्यात सरकारचं हित होतं. आपली 'शासन' म्हणून असलेली ताकद कधी वापरायची आणि 'सत्ताधारी म्हणून न्याय करणारे आम्हीच आहोत' याची केवळ जाणीव देऊन बहुतांश प्रश्न कसे आपल्या सोयीने सोडवायचे, हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांचं खरं कौशल्य असतं. लोकशाहीत 'सरकार' ही कधीच एक व्यक्ती नसते. सरकारच्या धोरण-नीतीत अनेकांचे आडाखे-विचार-मनसुबे दडलेले असतात. राजकीय प्रश्न हाताळताना यात जेवढी एकवाक्यता असेल, तेवढं त्या सरकारचं यश वाढत असतं. आंदोलन संपवण्यासाठी शेवटच्या दोन दिवसांत शिताफीने ज्या हालचाली झाल्या, त्यावरून या सरकारचं मुत्सद्दीपण अधोरेखित झालं होतं. पण, राजीनामा द्यावा लागलेल्या धर्मेंद्र प्रधान(Dharmendra Pradhan)यांचं संसदेच्या आवारात दुसऱ्याच दिवशी जे स्वागत झालं, त्यातून या यशाला गालबोट लागायला सुरुवात झाली, असं दिसतं. विद्यार्थी आंदोलकांवर बिहारमध्ये एके-४७ मधून गोळीबार झाल्याने त्यात आणखी भर पडली. सावरलेली सरकारची प्रतिमा या प्रकरणात पुन्हा घसरण्याची, आंदोलकांच्या सरशीची शक्यता माध्यमांना दिसू लागली. तशा वृत्तांकनाला सुरूवात होत असतानाच संबंधित पोलिस अधिकाऱ्याच्या निलंबनाची घोषणा झाली. आंदोलन मागे घेताना 'आंदोलक विद्यार्थ्यांवर कोणतेही खटले दाखल होणार नाहीत' असं आश्वासन विद्यार्थी नेत्यांनी मिळवलं होतं. पण, घाईघाईने त्यालाही हरताळ फासला जातो आहे, अशा बातम्या दिल्लीसह विविध राज्यांतून येऊ लागल्याने सरकारच्या विश्वासार्हतेचा प्रश्न उपस्थित होऊ लागला होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी(Devendra Fadnavis) अत्यंत सावधपणे, राजकीय परिपक्वता दाखवत महाराष्ट्रापुरता हा विषय निकाली काढला. बिहार आणि आसाम सरकारांनीही मग तसा निर्णय घेतला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचीही त्याला जोड मिळाली. आणखी एक दरड ढासळण्यापासून रोखली गेली! भारतात सरकारकडे एवढी प्रचंड शासनक्षमता आहे, की तिचा पूर्ण वापर करण्याची वेळ क्वचितच येते. इथलं सामाजिक, राजकीय वातावरणही विवेकी, परिपक्व आहे. लोकशाही शासन व्यवस्था इथे अंगवळणी पडली आहे. इस्लामी देशांसारखा सत्तेच्या पाशवी बळाचा वापर करावा लागत नाही. केंद्र सरकारला घटनादत्त अधिकारांचं मोठं वरदान आहेच; त्यात सरकार नुसतं स्थिर नाही, चांगलं भरभक्कम आहे. देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रभावाखालीच आहे. अशा परिस्थितीत सत्तेचा 'शासन' म्हणून किंचितही अधिक वापर सरकारच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम करणारा ठरू शकतो.

## संस्कृत सुभाषित

ध्यानमूल गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरो । पद्म । मंत्रमूलं
गुरोर्वाक्यं, मोद्यमूलं गुरोः कृपा ॥

अर्थ : गुरूचरित्रातील हे वचन आहे. श्री गुरू हेच सर्वस्व । ध्यान करायचे ते श्रीगुरूंच्या मूर्तीचे. पूजा श्री गुरूंच्या चरणांची, गुरूवाक्य हेच सर्वस्व आणि श्री गुरुंची कृपा हाच मोक्ष.

## गुरु वचन

### अशुभ झाले शुभ : आचार्य शिवेंद्र नागर

सद्पुरुषचे लक्षण काय? संसारासासाठी निरर्थक असलेल्या वस्तुंनी तो व्यक्ती संतुष्ट आहे. गल्लीतल्या कपड्याच्या तुकड्याने ज्याने शाल बनवली आहे, त्याचे मन, पाप-पुण्यापेक्षा मोठे आहे. असा योगी कधी बालकाप्रमाणे खेळतो तर कधी वेडा होतो. त्यास खेळताना पाहून तो वेडा झाला असे समजू नका. वेड्यासारखे समजा, बालकाप्रमाणे माना. त्याच्या शरीराला कमीत कमी वस्तूंची गरज आहे व त्यावर संतुष्ट आहे. आपण जितक्या जास्त वस्तूंवर अवलंबून आहोत, तितके जास्त दुःखी आहोत.

५० वर्षापूर्वी स्वयंपाक घर आजच्या इतकी संपन्न नव्हते. आज आपल्याकडे मिक्सर, गिझर, कुलर, कुकर, मायक्रोवेव्ह अवन आहे. वेळ सुद्धा आहे पण त्या वेळेची तरतूद कुठे होत आहे. जितके जास्त आपण वस्तुंवर अवलंबून राहू, तितके आपले दुःख वाढते. जर अमेरिकेत कोक बंद झाले तर लोक तो धक्का कसे सहन करतील. जर भारतात चहावर बंदी लावण्यात आली तर काय होईल!

शब्द -विषय अर्थात् यरू विश इति। जे विष आहे, ते नियंत्रित केले पाहिजे. तुम्ही एखादे औषध घेता तेव्हा त्यावर लिहिले असते की 'पॉयझन' म्हणजे काय? जर याचा दुरुपयोग केला म्हणजे जास्त मात्रात घेतले तर तुम्ही दगावू शकतात. ज्या माणसाच्या गरजा कमी आहेत, ज्याचे शरीर योगात आहे, तो यामुळे जास्त प्रभावित होणार नाही. तो पाप-पुण्य, शुभ-अशुभ विचारातून मुक्त आहे. आपल्या डोक्यात शुभ-अशुभ फिट झाले आहे. दक्षिण भारतात डोक्यावर पदर घेणे अशुभ मानले जाते, उत्तर भारतात डोक्यावर पदर घेणे शुभ मानले जाते. पंजाबमध्ये उडीद दाळ शुभ प्रसंगी खाल्ली जाते व उत्तर प्रदेशात उडीद दाळ मृत्यू प्रसंगी खाल्ली जाते. उडीद दाळ एका ठिकाणी शुभ तर इतर ठिकाणी अशुभ आहे. एका ठिकाणी डोक्यावर पदर घेणे शुभ आहे तर दुसऱ्या ठिकाणी अशुभ.

५० वर्षापूर्वी मुलींचे नोकरी करणे अशुभ होते, ते आज शुभ झाले. विदुर नीतित दूध विकणे आई विकण्यासारखे आहे. काळ बदलला. दुध विकणे वाईट पण विना नफा-तोटा तत्वावर विकणे योग्य आहे. काळ आणखी बदलला. दूध विकणे योग्य आहे त्यात थोडा नफा झाला तर चालते पण कमीत कमी पाणी टाकून विकावे. आज तर दुध विकणे, नफा कमावणे, पाणी टाकणे सुद्धा योग्य पण स्वच्छ पाणी टाकून तरी विका.

काही काळापूर्वी जी गोष्ट शुभ होती ती आज अशुभ होऊ शकते. काही काळापूर्वी जे अशुभ होते ते आज शुभ असू शकते. पाप-पुण्याच्या फेऱ्यातून संत वर आले आहेत. गीतेत वारंवार येते की, दोन्ही सैन्यांमध्ये कौरव नकारात्मक, पांडव सकारात्मक दिसतात. ज्ञानी चांगल्या-वाईटातून वर येतो. असा माणूस संसारात बालकाप्रमाणे आहे.

मुलांना येणाऱ्या काळाची चिंता किंवा गतकाळाचे दुःख नाही. ज्ञानी व्यक्ती मुलाप्रमाणे आहे. मुलं नेहमी वर्तमानात राहतात. शंकराचार्य म्हणतात की, ज्ञानी व्यक्ती वेड्याप्रमाणे असतो. तो ज्या पातळीवर आहे, ते आपणास समजू शकत नाही. त्याच्यासाठी कुणी आपले किंवा त्रयस्त नाही. ज्या शरीराच्या गरजा कमी आहेत, जे पाप-पुण्यापेक्षा वर आहेत, ते लोक वेड्याप्रमाणे आहेत, ते बालकाप्रमाणे आहेत.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:गर १७:२९:०९ |
| १५ ऑगस्ट २०२६ | करण:वणिज |
| शनिवार | २९:०५:३३+ |
| विक्रम संवत्- २०८२ | सूर्य:कर्क |
| श्रावण शके | चन्द्र:कन्या०९:३४:१७ |
| संवत्- १९४८ | हिजरी सन् - १४४८ |
| संवत्सर -पराभवनाम | मुस्लिम मास - रबिलावल |
| अयन- दक्षिणयन | तारीख - १ |
| मास- श्रावण | विशेष |
| ऋतु- सौर वर्षा | स्वातंत्र्य दिन |
| शुक्ल पक्ष | पारशी फरवर्दिन मासारंभ |
| तिथि:तृतीया १७:२९:०९ | अश्वत्तमारुती पूजन |
| नक्षत्र:उत्तराफाल्गुनी | पारशी नूतन वर्ष सन |
| २७:२५:१२+ | १३९६ प्रारंभ |
| योग:शिव ०७:०८:१८ | शनैश्वर शिंगणापूर |
| योग:सिद्ध २९:२०:३४+ | अभिषेक (श्रावणातील |

## दैं. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 8 | 7 | 4 | | | |
| | 9 | | | | 5 | 8 | | |
| 7 | | 8 | | | 9 | | 3 | 2 |
| | | 1 | | | 2 | | 4 | 3 |
| 3 | | 7 | | 8 | | 1 | | 9 |
| 5 | 6 | | 1 | | | 2 | | |
| 8 | 3 | | 5 | | | 7 | | 4 |
| | | 5 | 9 | | | | 2 | |
| | | | 3 | 4 | 8 | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०४० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 1 | 6 | 4 | 3 | 7 | 9 | 8 |
| 7 | 4 | 9 | 8 | 1 | 2 | 5 | 3 | 6 |
| 8 | 6 | 3 | 9 | 5 | 7 | 2 | 1 | 4 |
| 9 | 2 | 5 | 4 | 3 | 8 | 6 | 7 | 1 |
| 3 | 8 | 7 | 1 | 9 | 6 | 4 | 5 | 2 |
| 6 | 1 | 4 | 2 | 7 | 5 | 9 | 8 | 3 |
| 5 | 9 | 8 | 3 | 2 | 4 | 1 | 6 | 7 |
| 1 | 3 | 2 | 7 | 6 | 9 | 8 | 4 | 5 |
| 4 | 7 | 6 | 5 | 8 | 1 | 3 | 2 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १०५७ – लुम्फानानच्या लढाईत स्कॉटलंडचा राजा मॅकबेथचा अंत.
- १२६१ – मायकेल आठवा पॅलियोलोगस बायझेन्टाईन सम्राटपदी.
- १५१९ – पनामा सिटी शहराची स्थापना.
- १५३७ – ऍसन्शन शहराची स्थापना.
- १५४० – पेरूतील अरेकिपा शहराची स्थापना.
- १६०९ – इंग्लंडच्या साउथॅम्प्टनहून मेफ्लॉवर जहाजात ईंग्लिश प्रवासी निघाले. अमेरिकेत कायमस्वरूपी युरोपियन वसाहत निर्माण करणारी ही पहिली टोळी होती.

### राष्ट्रीय

- १९४७ – भारतावर राज्य करणे ब्रिटिशांना अशक्य झाल्यामुळे लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या हस्ते भारताला स्वातंत्र्य देण्यात आले.
- १६७२ – छत्रपती शिवाजीमहाराजांचा खांदेरी घेण्याचा प्रयत्न फसला. पुढे १६७५च्या ऑगस्ट महिन्यातच ते यशस्वी झाला.

### जन्म

- १००१ – डंकन पहिला, स्कॉटलंडचा राजा.
- १७६९ – नेपोलियन बोनापार्ट, फ्रांसचा सम्राट.
- १८७२ – योगी अरविंद बाबू घोष, आधुनिक भारताच्या स्वातंत्र्यचळवळीतील थोर क्रांतिकारक व तत्त्वचिंतक.
- १८१३ – जुल्स ग्रेव्ही, फ्रांसचा राष्ट्राध्यक्ष.
- १८७२ – श्री ऑरोबिंदो, भारतीय तत्त्वज्ञानी.
- १८८६ – बिल व्हिटली, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

### निधन

- १०३८ – स्टीवन पहिला, हंगेरीचा राजा.
- १०४० – डंकन पहिला, स्कॉटलंडचा राजा.
- १०५७ – मॅकबेथ, स्कॉटलंडचा राजा.

## : SMS :

Shaadi shuda walePatni: Suno ji, mujhe 2 options do
Pati: Haan bolo
Patni: Option 1 - Main sahi hu Option 2 - Main sahi hu
Pati: ....chai bana du?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २८.७ | २३.२ |
| अहमदनगर | २९ | २२.९ |
| अकोला | ३४.५ | २५.६ |
| अमरावती | ३३.९ | २५ |
| बीड | ३५.४ | २५.८ |
| भंडारा | ३३.९ | २५.८ |
| बुलढाणा | ४६ | ३४.४ |
| चंद्रपूर | ३६.३ | २५.९ |
| चेन्नई | ४०.१ | ३१.९ |
| नवी दिल्ली | ४५.७ | ३६.४ |
| धुळे | ३४.२ | २५.३ |
| गोंदिया | ३२.५ | २५.७ |
| जळगाव | ३४ | २५ |
| कोल्हापूर | २७.२ | २३.१ |
| लातूर | ३१ | २३.७ |
| मुंबई | ३२.४ | ३० |
| नागपूर | ३४.८ | २५.७ |
| नांदेड | ३२.८ | २५.१ |
| नंदूरबार | २९.४ | २४.५ |
| नाशिक | २७.२ | २३.३ |
| पुणे | २५.४ | २२.४ |
| पंढरपूर | ३३.९ | २३.६ |
| सातारा | २७.२ | २२.९ |
| सांगली | ३०.७ | २३.५ |
| सोलापूर | ३४.६ | २३.९ |
| वर्धा | ३५.१ | २५.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम आपले कर्तृत्व आणि कुवत सिद्ध करण्याच्या संधी मिळतील.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर व्यापारी व्यवहाराचा नेमका कल लक्षात घेऊन व्यवहाराची दिशा ठरविणे आवश्यक ठरेल.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा :पश्चिम देवधर्म, पूजाअर्चा करण्यात वेळ कसा जाईल कळणार नाही. मानसिक समाधान मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:क़ाळा, शुभ दिशा: पश्चिम कामाच्या निमित्ताने केलेला प्रवास नफा देईल. आर्थिकदृष्ट्या होणाऱ्या वाटचाली वेगवान होतील.

**मिथुन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: दक्षिण कायदेशीर पुरावे असलेले कागदपत्र गहाळ होणार नाही याची काळजी घ्या.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा : पश्चिम मनावर येणारी काही दडपणे दूर करण्यासाठी घरातील ज्येष्ठांचा सल्ला अवश्य घ्या.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण घरातील सदस्यांपैकी एखाद्या व्यक्तीचा वाढदिवस थाटामाटात साजरा कराल. आरोग्य उत्तम राहील.

**मकर :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा: उत्तर नोकरदारांना वरिष्ठांचे बोलणे सहन करावे लागेल. वृद्धांनी आपले पथ्यपाणी व तब्येत सांभाळावी.


**सिंह :** शुभ रंग:भूरा, शुभ दिशा:उत्तर वडीलधारी मंडळीनी दिलेला सल्ला घेऊन कामात केलेले बदल अफलातून यश देतील.

**कुंभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण बेकारांना कामधंदा मिळेल. अविवाहितांचे विवाहाचे प्रश्न सुटतील. आर्थिक प्रश्न सुटतील.

**कन्या :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर सामाजिकदृष्ट्या मोठे कार्यविश्व उभे करू शकाल. एखाद्या घरगुती कार्यक्रमाचे आयोजन कराल.

**मीन :** शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम थोरामोठ्यांच्या गाठीभेटीतून बौद्धिक वर्चस्वही सिद्ध करता येईल. बेकारांना कामधंदा मिळेल.

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४१



### आडवे शब्द

१. भित्रा, कच खाणारा
३. मधुमक्षिका
६. मृत्तिकापात्र
९. समुद्रावरील पूर्ण भरतीची वेळ
१२. तपासणी करणारा
१४. वेल
१५. सर्वस्व
१७. पाठवणी
१९. रान, वन
२०. जनावरांची आरोळी
२२. मादीच्या विरुद्ध
२३. हिंदुस्थान
२५. वडिलांचे मराठी संबोधन
२७. उगीच
२९. रांग
३०. ताप देणारे, त्रासदायक
३२. अंगरखा
३३. आरोप
३५. पोपट
३६. शासकीय
३९. गीतातील एक शब्दालंकार
४१. पहारेकरी
४३. नाविक दल
४४. मजबूत, भक्कम
४५. समाजातील वजन
४६. पोळ्या भाजण्याचे पात्र
४७. खाजणारा
४८. पोथीचे वाचन
५०. समोरासमोरची चकमक
५२. थोडक्यात राष्ट्रीय जनता दल, लालूप्रसाद यांचा पक्ष
५४. माता पिता
५९. हवाई अड्डा
६१. कचेरी (इंग्रेजी)
६२. ओलसर हवा
६४. बर्फाचा मोठा भाग
६५. चिखल उडू नये म्हणून वाहनांना लावलेले साधन (इंग्रेजी)
६७. अहंकार
६८. अधिक महिन्याचे नाव
६९. एक पाताळ
७१. अटीची भाषा
७३. दहावी रास
७४. पुष्कळ
७५. मांजर
७६.ऐटबाज
७७. असे श्वसन मन:शांतीसाठी फायद्याचे
७८. हावरटपणा
७९. मोठा हातोडा
८०. हात

### उभे शब्द

१. पावसाचे दिवस
२. प्राचीन
४. एकापाठोपाठ एक, जोरकसपणे
५. गार
६. विशेष
७. फाटलेल्या दुधाचा पदार्थ
८. रसाळ
९. घनिष्ट संबंध
१०. जननी, आई
११. न्यूनता
१३. पुष्पदल
१६. मादीच्या विरुद्ध
१८. कृष्णार्जुनाची जोडी
२१. खर्चात कपात
२४. तंबाखूचे सुगंधी चूर्ण
२६. पावा
२८. बडबड, त्रास
२९. परिचय
३१. दरवाजा
३३. निखळ सौंदर्य
३४. वरण, आमटी वगैरे
३७. लक्ष्मीचे एक नाव
३८. फॅक्टरीला मराठी शब्द
४०. मध
४२. घन, घट्ट
४३. कुंभाराची भट्टी
४४. धाक, वचक
४६. थेट, सरळ
४९. नवरा
५०. लहान
५१. पोस्टद्वारे पैसे पाठवणे (इंग्रजी)
५३. ढग (सं.)
५४. यल्लमा देवीचे स्थान
५५. तोटी
५६. जून, निबर
५७. गुजराथी नृत्यप्रकार
५८. भेग, चीर
५९. शुभ्र, पांढरा स्वच्छ
६०. पोलीस, शेरीफ
६३. भ्रमर, भुंगा
६४. पाण्याचा गोठलेला प्रवाह
६५. अधिक महिना
६६. एक रंगीत कदमूळ
७०. एक पक्षी
७२. युवक, जवान
७३. उंटाच्या पाठीवरील उंचवटा
७७. बगळा

### जम्बो शब्दकोडे क्र. १०४० चे उत्तर

आडवे उत्तर : १.अवघड ६.आजतागायत १०.वरण ११.मजल दरमजल १५.दहा १६.तारकस १७.दलाल १९.वसन २२.राग २५.राळ २६.हजरजबाबी २७.पातळसर २९.वानर ३०.वात ३१.सम ३२.जवान ३३.पागा ३४.खाच ३६.रणगाडा ३७.कुलक्षणी ३८.पोरकटपणा ४१.माता ४२.पामर ४३.रण ४५.गवार ४७.राणी ४८.सराफ ४९.तळतळाट ५०.महोदय ५२.लवलव ५३.चाक ५५.आवरणे ५७.वमन ६०.वाटप ६२.लट ६३.नस ६४.सनदशीर ६६.लाथ ६७.काच ६८.गर्व ६९.बदक ७१.सय ७२.घट ७३.सरासरी ७४.ताटवा ७५.वर्तमानपत्र ७७.कुंपण ७८.बस्तान ७९.नयन ८०.साकड

उभे उत्तर : १.अवयव २.वर ३.घण ४.सांज ५.उदर ६.आज ७.जलद ८.गाफील ९.तळमळ ११.महाराज १२.लता १३.रकमपात १४.मस १८.लाचार २०.सहनशीलता २१.नजर २३.गबाळ २४.आळस २५.राजवाडा २८.समर ३०.वाचक ३२.जगावेगळा ३३.पाणी पाणी होणे ३४.खार ३५.कृपण ३७.कुमारी ३८.पोर ३९.टरफल ४०.कोर ४४.मळवट ४६.वाटचाल ४७.रामरस ४९.तलवार ५१.यवन ५४.कटकट ५६.वनचराई ५८.मद ५९.नशीबवान ६१.पलायन ६४.सर्व ६५.रद ६७.कासव ६८.गरीब ७०.कवन ७१.समान ७२.पत्रक ७४.तान ७६.पसा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### 'सूर्यदत्त'तर्फे स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्षानिमित्त उपक्रम सप्ताहाचे आयोजन

**पुणे : दैनिक संध्या**

भारताच्या स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने १४ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सप्ताहभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यामध्ये 'एकता, समरसता आणि राष्ट्राभिमान' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित देशभक्तिपर, सांस्कृतिक, क्रीडा, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम राबवले जाणार आहेत. भारताला समृद्ध, सशक्त आणि जागतिक पटलावर अग्रगण्य बनविण्याच्या 'विकसित भारत' या राष्ट्रव्यापी प्रवासात सूर्यदत्त शिक्षण संस्था गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने अग्रभागी राहिला आहे. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया यांच्या नेतृत्वाखाली या सर्व उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे. विद्यार्थी घडला तरच समाज घडतो आणि सशक्त समाजातूनच समृद्ध राष्ट्राची निर्मिती होते, या विचारावर डॉ. चोरडिया यांची अढळ श्रद्धा आहे. म्हणूनच सूर्यदत्तच्या माध्यमातून शिक्षणासोबतच संस्कार, आरोग्य आणि राष्ट्रनिर्मितीची एक अखंड चळवळ उभारली आहे. या महोत्सवात देशाच्या संरक्षणासाठी आपल्या प्राणांचे सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांच्या १० वीरपत्नींचा विशेष 'वीरता सन्मान' देऊन गौरव करण्यात येणार आहे. १५ ऑगस्ट रोजी मुख्य स्वातंत्र्यदिन सोहळ्यात कर्नल पाल यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण पार पडेल, तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा 'सूर्य चक्र पुरस्कार' देऊन गौरव केला जाईल. याशिवाय, भारताची समृद्ध परंपरा आणि शूरवीरांचा इतिहास जिवंत करणारा भव्य देशभक्तीपर फॅशन शो, विशेष नाट्य सादर होईल. या निमित्ताने 'व्होकल फॉर लोकल' आणि 'आत्मनिर्भर भारत' या अभियानाला बळ देण्यासाठी भारतातील पारंपरिक हस्तकला, विविध स्वदेशी हस्तनिर्मित उत्पादनांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. 'फिट इंडिया' उपक्रमांतर्गत क्रीडा, योग व फिटनेस सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच, 'एक भारत, श्रेष्ठ भारत' संकल्पनेवर आधारित विविध राज्यांचे लोकनृत्य, समूहगायन, देशभक्तीपर संगीताचा ऑर्केस्ट्रा आणि भारतीय खाद्यसंस्कृतीचे स्टॉल्स असणार आहेत. याशिवाय विद्यार्थ्यांसाठी निबंध व पोस्टर स्पर्धा, पथनाट्ये, पुस्तक प्रदर्शन, परिसंवादाचेही आयोजन करण्यात आले आहे. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "स्वातंत्र्यदिन हा ध्वजारोहण आणि राष्ट्रगीतापुरता मर्यादित राहता कामा नये. या निमित्ताने 'विकसित भारत' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पना प्रत्येक विद्यार्थ्याच्या विचारात आणि कृतीत रुजवणे गरजेचे आहे. 'सूर्यदत्त' प्रत्येक विद्यार्थ्याला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देतानाच त्याला एक जबाबदार, सुजाण आणि देशभक्त नागरिक बनवण्यासाठी कटिबद्ध आहे."

### कसबा गणपती मंदिरात लक्ष दुर्वा गणेशयाग ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिर

**पुणे : दैनिक संध्या**

ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिरात रविवार, दिनांक १६ ऑगस्ट २०२६ रोजी असणाऱ्या श्रावण शुद्ध चतुर्थी अर्थात विनायकी चतुर्थीच्या निमित्ताने लक्ष दुर्वा गणेशयागाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने एक लाख दुर्वांचे हवन करण्यात येणार असून, हा गणेशयाग मंदिराच्या सभामंडपात श्री जयती गजाननाच्या मूळ मूर्तीसमोर दोन दिवस संपन्न होणार आहे. या गणेशयागाची सुरुवात शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट रोजी होणार असून सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत यागविधी होईल. तसेच सायंकाळी ७ ते ८ या वेळेत मंत्रजागर आयोजित करण्यात आला आहे. रविवार, दिनांक १६ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत यागविधी होऊन पूर्णाहुती आणि महाआरतीने गणेशयागाची सांगता होणार आहे. श्री गणेशाच्या पूजेमध्ये दुर्वांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. दुःखांचा आणि अनिष्टतेचा नाश करणारी म्हणून दुर्वेचे महत्त्व सांगितले जाते. दुर्वेच्या उत्पत्तीच्या कथा श्री गणेश पुराण तसेच श्री मुद्गल पुराणात आढळतात. दुर्वेची महती सांगणारे दुर्वा स्तोत्रही मुद्गल पुराणात उपलब्ध आहे. पार्वती देवीने भाद्रपद शुद्ध चतुर्थीपर्यंत केलेल्या श्री गणेश पार्थिव पूजाविधीची सुरुवात याच श्रावण शुद्ध चतुर्थीपासून केल्याचे संदर्भ आढळतात. या पार्श्वभूमीवर विनायकी चतुर्थीचे औचित्य साधून लक्ष दुर्वा गणेशयागाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यानिमित्त गणेशभक्तांनी श्री जयती गजाननाच्या मूळ मूर्तीचे दर्शन तसेच गणेशयागाच्या निमित्ताने होणाऱ्या मंत्रोच्चाराचे श्रवण यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिर ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.


### अदिश जैन फाउंडेशनतर्फे महोत्सव

**पुणे : दैनिक संध्या**

अदिश जैन फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त हास्यकविता महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट रोजी नवी पेठेतील लोकमान्य वाचनालयाजवळ अक्षरवेल सभागृहात हा महोत्सव होणार आहे. महोत्सवासाठी प्रवेश विनामूल्य आहे, अशी माहिती आदिश जैन फाउंडेशनच्या प्रमुख, कवयित्री मृणाल जैन यांनी दिली. वर्धापन दिनानिमित्त अदिश जैन फाउंडेशनतर्फे खुली हास्यकवितालेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला देश-विदेशातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. ज्येष्ठ गझलकार म. भा. चव्हाण आणि प्रसिद्ध हास्यकवी बंडा जोशी यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. महोत्सवाच्या पहिल्या सत्रात दुपारी ३.३० वाजता स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी विजेत्या हास्य कवितांचे अभिवाचनही केले जाणार आहे. महोत्सवाच्या दुसऱ्या सत्रात अष्टपैलू साहित्यिक कै. आचार्य अत्रे यांच्या जयंतीच्या निमित्त सायंकाळी ५.३० वाजता ख्यातनाम हास्यकवी बंडा जोशी यांच्या विडंबन गीतांची 'झेंडूची नवी फुले' ही हास्यमैफल सादर होणार आहे.

### विद्यार्थी साहाय्यक समिती देणार कौशल्य, उद्योजकतेचे धडे

**पुणे : दैनिक संध्या**



विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये कौशल्याधारीत शिक्षणावर भर देण्यासाठी कौशल्य व उद्योजकता केंद्राची स्थापना करण्यात येत आहे. या केंद्राला पद्मश्री प्रतापराव पवार कौशल्य व उद्योजका विकास केंद्र असे नाव देण्यात आले आहे. या केंद्राचे येत्या १५ ऑगस्ट रोजी ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता उद्घाटन होणार आहे. सेनापती बापट रस्त्यानजीक समितीच्या श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे मुलींचे वसतिगृहातील एका मजल्यावर हे केंद्र सुरु होत आहे, अशी माहिती समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी दिली. ज्येष्ठ उद्योजक आणि समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या पुढाकारातून आणि अर्थिक योगदानातून याठिकाणी एआय प्रशिक्षण, रोबोटीक्स लॅब, परदेशी भाषा वर्ग सुरु करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे या प्रशिक्षणाचा लाभ पहिल्यांदाच समितीतील विद्यार्थांबरोबरच इतर विद्यार्थ्यांनाही घेता येणार आहे. पवार मागील ५० वर्षांहून अधिक काळ संस्थेशी जोडलेले असून, संस्थेच्या प्रगतीचा विचार करत वेळोवेळी ते संस्थेसाठी मोलाचे योगदान देत असल्याने या केंद्राला त्यांचे नाव देण्यात येत असल्याचे समितीकडून सांगण्यात आले.



# भानूबेन नानावटी कॉलेजच्या संघाची बाजी

■ पुणे (दै. संध्या)

विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ट्रस्ट संचालित पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पिरंगुट, पुणे यांच्या वतीने 'आर्किटेक्चरल कोषंट २०२६' या आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. डेक्कन जिमखाना येथील श्री महावीर जैन विद्यालयाच्या बीएमएस सभागृहात ही स्पर्धा पार पडली. पुणे शहरातील वास्तुकला महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी आयोजित होणाऱ्या या स्पर्धेचे यंदाचे १५वे वर्ष होते.

स्पर्धेत पुण्यातील १३ वास्तुकला महाविद्यालयांतील एकूण ६८ संघांनी सहभाग घेतला. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या तानिया भियानी आणि देविका मंधाने यांनी प्रथम क्रमांक मिळवत १२ हजार रुपये रोख, ट्रॉफी व प्रमाणपत्र पटकावले. मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या शांभवी शिंदे आणि रिया पाटील यांनी द्वितीय क्रमांक मिळवत ८ हजार रुपये रोख, ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळविले. पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या तक्षील कडू आणि अनिरुद्ध शाह यांनी तृतीय क्रमांक मिळवत ६ हजार रुपये रोख, ट्रॉफी व प्रमाणपत्र पटकावले.

अंतिम फेरीत विविध विषयांवरील आठ फेऱ्यांची प्रश्नमंजुषा रंगली. या फेरीचे सूत्रसंचालन पी. व्ही. पी. कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या ज्येष्ठ प्राध्यापिका आर्कि. विजया श्रीनिवासन यांनी केले.

यंदाच्या प्रश्नमंजुषेची मध्यवर्ती संकल्पना 'वास्तुकलेतील महिलांचे योगदान' अशी होती. या विषयावर आधारित विविध फेऱ्यांसाठीचे प्रश्न पी. व्ही. पी. कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या प्राध्यापक आर्कि. आरथी चंद्रशेखर आणि आर्कि. देवेंद्र देशपांडे यांनी संशोधन करून तयार केले. सीसीबीए डिझाइन्स या पुण्यातील नामांकित वास्तुकला संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक रामप्रसाद अक्कीसेट्टी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले, 'पुण्यातील सर्व वास्तुकला महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन शहराच्या विकासासाठी विचार करावा.' उर्वरित तीन अंतिम संघांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. बी. के. पी. एस. कॉलेजच्या आयुष खेमनर आणि वृषभ एकवे, पी. व्ही. पी. कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या पार्थ दामाहे आणि रौनक लुंकड तसेच बी. एन. सी. ए. कॉलेजच्या सृष्टी सिंग चौहान आणि दीपिका वर्मा यांना ही पारितोषिके देण्यात आली. अंतिम फेरीतील सर्व संघांना सीसीबीए डिझाइन्सतर्फे वास्तुकलेवरील पुस्तकांचा संचही देण्यात आला. सर्वाधिक संघांचा सहभाग नोंदविल्याबद्दल एनआयसीएमएआर स्कूल ऑफ आर्किटेक्चरला विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. एनआयसीएमएआरतर्फे एकूण १३ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. प्रमुख पाहुणे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. 'आर्किटेक्चरल कोषंट २०२६'चे संपूर्ण नियोजन महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या आर्कि. सुचिता सयाजी, उपप्राचार्या डॉ. वंदना पुसाळकर आणि ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. आर्कि. शेखर गरुड यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे सचिव जितेंद्र पितळीया तसेच विश्वस्त युवराज शाह उपस्थित होते.

## 'असा घडला महाराष्ट्र' नव्या रेडिओ शोची घोषणा

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या जडणघडणीचा इतिहास आणि त्यामागील रंजक, अपरिचित कथा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने रेडिओ मिर्चीच्या वतीने 'असा घडला महाराष्ट्र' या नव्या रेडिओ कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली. प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे यांच्या आवाजातून आणि निवेदनातून महाराष्ट्राच्या इतिहासातील अनेक माहिती नसलेल्या पैलूंवर या कार्यक्रमातून प्रकाश टाकला जाणार आहे. २४ ऑगस्ट पासून सकाळी ८ ते १० आणि संध्याकाळी ६ ते ८ वाजता प्रसारित होणार आहे.

विधी महाविद्यालय रस्त्यावरील लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या कार्यालयात बुधवारी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुबोध भावे बोलत होते. कार्यक्रमास लोकमान्य मल्टिपर्पजचे विभागीय प्रमुख सुशील जाधव, रेडिओ मिर्चीचे व्यवसाय प्रमुख जयेश पाटील, प्रादेशिक प्रमुख पुनीत केळकर, आरजे विभागाच्या प्रमुख स्मिता रणदिवे, राहुल गजबार आदी उपस्थित होते. लोकमान्य मल्टिपर्पज, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि चंद्ररूप क्लॉथ स्टोअर्स यांचे या उपक्रमाला सहकार्य लाभले आहे.

**यासाठी आयुष्यभर प्रयत्न**

सुशील जाधव यांनी लोकमान्य मल्टिपर्पजच्या वाटचालीची माहिती देताना सांगितले की, संस्था १९९५ पासून कार्यरत असून पुण्यातील कामकाजाला २० वर्षे पूर्ण झाली आहेत. संस्थेच्या २१३ शाखा असून सुमारे १२ हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. त्यापैकी सुमारे चार हजार कोटी रुपयांच्या ठेवी पुणेकरांच्या आहेत. संस्थेचे प्रमुख किरण ठाकूर यांनी बेळगावमध्ये 'तरुण भारत'ची सुरुवात करून बेळगाव महाराष्ट्रात यावे यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. बेळगावच्या इतिहासाशी संबंधित विविध बाबींचाही या कार्यक्रमातून ऊहापोह केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

भावे म्हणाले, "आपल्या कुटुंबातील व्यक्ती एकत्र आल्यावर पूर्वीच्या गोष्टी सांगितल्या जातात. त्या गोष्टींमधून ऊर्जा मिळते आणि नव्याने काम करण्याची प्रेरणा मिळते. महाराष्ट्र हा आपला मोठा परिवार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्याच्या जडणघडणीशी संबंधित अनेक अपरिचित आणि रंजक गोष्टी समोर येतील. मातीशी असलेली आपली नाळ पुन्हा जोडण्याचा हा प्रयत्न आहे. माझा महाराष्ट्र लोकांपर्यंत पोहोचवणे हा माझा स्वार्थ आहे."

रेडिओवरील निवेदकाचे काम आव्हानात्मक असल्याचे सांगत भावे म्हणाले, "चेहरा न दाखवता केवळ आवाजातून श्रोत्यांना जोडून ठेवणे सोपे नाही. आरजे यांच्याकडून मला अनेक गोष्टी शिकायला मिळत आहेत. 'असा घडला महाराष्ट्र'साठी रेडिओ मिर्चीच्या टीमने मोठा अभ्यास करून विश्वसनीय माहिती संकलित केली आहे."

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा संदर्भ देत भावे म्हणाले की, महाराजांच्या कर्तृत्वात जात-पात न पाहता सर्वांना सोबत घेऊन जाण्याची शिकवण आहे. शिवजयंतीला केवळ गाणी लावणे किंवा झेंडा घेऊन फिरण्यापेक्षा त्यांचे विचार आचरणात आणणे गरजेचे आहे. नकारात्मक वातावरणात सकारात्मक विचार पोहोचवून समाजाला मातीशी आणि इतिहासाशी जोडण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे. आपला जाज्वल्य इतिहास आणि पराक्रम याचा अभिमान आपण बाळगला पाहिजे आणि मराठी भाषा बोलण्याचा आग्रह आपणच धरला पाहिजे.



## वेनकॉब पुणे श्री २०२६ स्पर्धेत अक्षय वाडीकर विजेता

■ पुणे (दै. संध्या)

अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित म्हसोबा उत्सवानिमित्त महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन संलग्न पुणे जिल्हा हौशी शरीरसौष्ठव संघटना, फेडरेशन ऑफ बॉडी बिल्डिंग अँड फिजिक स्पोर्ट्स, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शरीरसौष्ठव संघटना यांच्या मान्यतेने व सहकार्याने महाराष्ट्रात प्रथमच जिल्हा पातळीवरील भव्य पारितोषिकांची असणारी 'वेनकॉब पुणे श्री २०२६' जिल्हास्तरीय खुल्या शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये अक्षय वाडीकर 'वेनकॉब पुणे श्री २०२६'चा विजेता ठरला, त्याला रु १ लाख रुपये पारितोषिक देवून गौरविण्यात आले. स्पर्धेत एकूण १२५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन आनंद पिंपळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रीय इंडियन बॉडीबिल्डिंग फिटनेस अँड फेडरेशनचे खजिनदार राजेश सावंत, श्री शिव छत्रपती पुरस्कार सन्मानित सिद्धार्थ मोरे, पुणे जिल्हा हौशी शरीर सौष्ठव संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र नांगरे, गौतम तांबे, प्रशांत जगताप, दिलीप धुमाळ आणि विश्वस्त अध्यक्ष राहुल सूर्यवंशी, विश्वस्त उपाध्यक्ष निवृत्ती जाधव आदी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी एकूण ३ लाख १३ हजार रुपयांची रोख पारितोषिके ठेवण्यात आली होती. पारितोषिक वितरण प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नवनाथ जगताप यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेतील 'वेनकॉब पुणे श्री २०२६' किताबाचा मान अक्षय वाडीकर याने पटकावला. 'वेनकॉब पुणे श्री २०२६' उपविजेतेपद आकाश दडमल याला मिळाले 'अपकमिंग बॉडी बिल्डर' किताब सलमान नालबंद याला, 'बेस्ट पोझर' किताब ऋषिकेश वेळमकर याने पटकाविला.

## आनंदी जीवनाचा मार्ग दाखवणारा सरश्री यांचा रविवारी विशेष कार्यक्रम

■ पुणे (दै. संध्या)

जीवनातील ताणतणाव, अस्थिरता आणि बदलत्या परिस्थितीतही आनंदी व प्रसन्न कसे राहता येईल, याचे मार्गदर्शन करणारा विशेष कार्यक्रम पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक सरश्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम रविवार, १६ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम मनन आश्रम, किरकटवाडी फाटा, सिंहगड रोड, पुणे येथे होणार असून सोशल मीडियाच्या माध्यमातूनही नागरिकांना या उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

दैनंदिन जीवनात प्रत्येक व्यक्तीला विविध प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत मनावरील ताण कमी करून अंतर्मनात शांतता आणि स्थैर्य कसे निर्माण करता येईल.

## थेऊरच्या चिंतामणी चॅरिटेबल ट्रस्टची अन्नदान सेवेची १२ वर्षे पूर्ण

■ पुणे (दै. संध्या)

श्री चिंतामणी चॅरिटेबल ट्रस्ट, थेऊरच्या मोफत भोजन प्रसाद अर्थात अन्नदान सेवेचे १२ वर्षे म्हणजेच एक तप पूर्ण झाले आहे. या कालावधीत तीन लाखांहून अधिक भाविकांनी या अन्नदान सेवेचा लाभ घेतला आहे. या सेवेच्या वर्धापनदिनानिमित्त शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ रोजी श्री महागणेश याग व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्री चिंतामणी चॅरिटेबल ट्रस्ट थेऊरचे मुख्य विश्वस्त मंगलमूर्ती विनायक आगलावे यांनी दिली.

हा धार्मिक सोहळा सकाळी ११ वाजता श्री चिंतामणी मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर असलेल्या श्रीरामकृपा हॉल येथे होणार आहे. श्री चिंतामणी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे १५ ऑगस्ट २०१४ पासून मोफत भोजन प्रसादाची अन्नदान सेवा सुरू आहे. गेल्या १२ वर्षांत तीन लाखांहून अधिक भाविकांनी या सेवेचा लाभ घेतला आहे.

अन्नदान सेवेचे हे कार्य पुढेही अखंड सुरू राहावे, यासाठी श्री अन्नपूर्णा कृपेने श्री महागणेश याग व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या सोहळ्यास उपस्थित राहून श्री महागणेश याग व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे. संपर्क - 9763644521 / 9922484964

# नवोन्मेष, कौशल्ये आणि नैतिक मूल्ये आत्मसात करा – राज्यपाल जिष्णु देव वर्मा

■ पुणे (दै. संध्या)

आजच्या गुंतागुंतीच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पारंपरिक शैक्षणिक शाखांच्या सीमा ओलांडणारे बहुविषयक शिक्षण आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्ये, नवोन्मेष, चिकित्सक विचार आणि नैतिक मूल्ये आत्मसात करून भविष्यातील आव्हानांसाठी स्वतःला सक्षम करावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. लोणी काळभोर येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठात (एमआयटी एडीटी) आयोजित ११व्या विद्यारंभ-२६ समारंभात ते बोलत होते. यावेळी माईर्स एमआयटी समूह संस्थांचे संस्थापक अध्यक्ष व कुलपती डॉ. विश्वनाथ दा. कराड, महाराष्ट्राचे माजी अतिरिक्त पोलीस महासंचालक जे. डी. लक्ष्मीनारायण, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कार्यकारी संचालक डॉ. विनायक घैसास, प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, डॉ. नचिकेत ठाकूर आणि कुलसचिव डॉ. महेश चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.



कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, क्वांटम संगणन, जैवतंत्रज्ञान, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे प्रत्येक क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. मात्र, तंत्रज्ञानासोबत नैतिकता, मूल्ये आणि करुणेचा अभाव असल्यास हीच तंत्रज्ञाने विनाशकारी ठरू शकतात. विज्ञानाचा वापर मानवजातीच्या कल्याणासाठी झाला पाहिजे, इतर मानवांच्या विनाशासाठी नव्हे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या वापरासोबत मानवता आणि करुणा जपणे अत्यावश्यक आहे, असेही श्री. वर्मा म्हणाले. विद्यारंभ समारंभ हा केवळ परिचयाचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील नव्या प्रवासाची सुरुवात आहे. भारताकडे जगातील सर्वात मोठ्या युवा लोकसंख्येपैकी एक आहे. या लोकसंख्यात्मक सामर्थ्याचे रूपांतर राष्ट्रनिर्मितीच्या शक्तीत करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक सर्वोत्तम पद्धतींचा स्वीकार करताना भारताच्या समृद्ध सभ्यतागत मूल्यांशी आणि ज्ञानपरंपरेशी जोडलेले राहणेही आवश्यक आहे, असे राज्यपालांनी स्पष्ट केले.

# माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा

**महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत माती आणि पाणी या दोन नैसर्गिक संसाधनांचे अनन्यसाधारण महत्व आहे. शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा थेट संबंध या दोन्ही घटकांशी आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आणि पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता ती व्यापक लोकचळवळ बनणे ही काळाची गरज आहे. याच विचारातून राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे.**







■ गजानन पाटील, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

(दै. संध्या)

दिवंगत सुधाकरराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करताना राज्यासमोरील दुष्काळ आणि पाणीटंचाईचे आव्हान केवळ मोठ्या धरणांच्या माध्यमातून सोडविता येणार नाही, हे ओळखले. पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे, तो जमिनीत मुरविणे आणि स्थानिक पातळीवरील जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे, या भूमिकेतून त्यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र दिला. पाणलोट विकास, भूजल पुनर्भरण, पाझर तलाव, गाव तलाव, नाला बांध, माती बंधारे आणि अन्य छोट्या जलसंधारण संरचनांवर त्यांनी भर दिला. जलसंधारणाला स्वतंत्र प्रशासकीय दिशा देत त्यांनी या विषयाला लोकसहभागाची जोड दिली.

१९९१ ते १९९३ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी घेतलेले अनेक निर्णय आजही दिशादर्शक ठरतात. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती आणि जलसंधारणाची कामे यांची सांगड घालून त्यांनी जलस्रोत निर्मितीला चालना दिली. जलसंधारण हे केवळ अभियांत्रिकीचे काम नसून गावागावातील नागरिकांच्या सहभागातून उभे राहणारे अभियान आहे, ही भूमिका त्यांच्या कार्यातून स्पष्ट झाली. आज जलयुक्त शिवार, भूजल पुनर्भरण, पाणलोट विकास यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते.

याच योगदानाची दखल घेत दिवंगत सुधाकरराव नाईक यांचा स्मृतिदिन १० मे हा २००३ पासून जलसंधारण दिन म्हणून साजरा केला जात होता. मात्र, स्मृतिदिनाऐवजी जन्मदिवस अधिक उत्साहपूर्ण आणि लोकसहभागातून साजरा व्हावा, या विचारातून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विभागातील अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित घटकांशी चर्चा करून २१ ऑगस्ट हा दिवस जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी यास मान्यता दिल्यानंतर शासनाने त्याबाबतचा निर्णय घेतला. त्यामुळे यापुढे दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्राच्या जलसंधारण चळवळीचा महत्त्वपूर्ण दिवस ठरणार आहे.

व्यापक जनसहभागाची जोड : यंदाचा जलसंधारण दिन केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता त्याला व्यापक जनसहभागाची जोड देण्यात आली आहे. १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था आणि विविध प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या अभियानातील सर्वात आकर्षक उपक्रम म्हणजे 'महा वॉकेथॉन २०२६ – वॉक फॉर वॉटर'. २१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी तीन किलोमीटरची महा वॉकेथॉन आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान दहा हजार नागरिकांच्या सहभागाचे उद्दिष्ट असून, राज्यभरातून तीन लाखांहून अधिक नागरिक प्रत्यक्ष सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

नागरिक, युवक-युवती, विद्यार्थी, महिला, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, 'माय भारत', क्रीडा संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग क्षेत्र, कलाकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर या उपक्रमात सहभागी होणार आहेत. ही केवळ चालण्याची स्पर्धा नसून जलसंधारणासाठी जनजागृतीची सामूहिक पावले आहेत.

वॉकथॉनच्या प्रारंभी सहभागी नागरिकांकडून मृद व जलसंधारणाची सामूहिक शपथ घेतली जाणार आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, मातीची धूप रोखणे, पावसाचे पाणी अडविणे आणि जलस्रोतांचे संवर्धन करणे याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' हा यंदाच्या अभियानाचा मुख्य संदेश आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेशही या चळवळीला दिशा देणार आहे. युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येणार आहे. 'रील फॉर सॉईल अँण्ड वॉटर कन्झर्वेशन' या उपक्रमातून १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींना मृद व जलसंधारणाचा संदेश सर्जनशील पद्धतीने मांडण्याची संधी मिळणार आहे. ३० ते ६० सेकंदांच्या इन्स्टाग्राम रिल्सच्या माध्यमातून मातीची धूप, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळी, बंधारे, वृक्षारोपण, भूजल पुनर्भरण आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर संदेश देता येणार आहे. अभिनय, संगीत, विनोद, लघुपट, ॲनिमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन दृश्ये किंवा अन्य नाविन्यपूर्ण माध्यमांचा वापर करून युवकांना आपली कल्पकता सादर करता येणार आहे. #SaveSoilSaveWater हा अधिकृत हॅशटॅग वापरून राज्यभरातून मोठ्या प्रमाणात रिल्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. जलसंधारणाचा संस्कार पुढील पिढीवर व्हावा यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. निबंध, चित्रकला, पोस्टर, वादविवाद स्पर्धा, जलसंधारणाची शपथ, 'एक शाळा–एक शोषखड्डा', जलमित्र किंवा जलदूत घोषित करणे अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना जलसंधारणाशी जोडले जाणार आहे. २१ ऑगस्ट रोजी दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या जलसंधारणविषयक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. अभियानाच्या कालावधीत ग्रामीण आणि शहरी भागात प्रत्यक्ष जलसंधारणाच्या कामांनाही गती दिली जाणार आहे.

विविध योजनांतर्गत कामांचे भूमीपूजन, लोकार्पण आणि जलपूजन, शेततळी व जलस्रोतांची पाहणी, अमृत सरोवरांच्या परिसरात वृक्षारोपण, नाला, तलाव, विहीर आणि पाझर तलावांची लोकसहभागातून स्वच्छता अशा उपक्रमांवर भर दिला जाणार आहे. जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक यांसारख्या उपक्रमांची माहितीही जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. जलसंधारणाच्या कामात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव, लोकसहभागातून श्रमदान, जलस्रोतांचे संवर्धन आणि जनजागृती या माध्यमातून शासन आणि समाज यांच्यातील सहभाग अधिक दृढ करण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समन्वय साधून कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

आज हवामान बदल, अनियमित पाऊस, वाढते तापमान, भूजल पातळीतील घट आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे जलसुरक्षेचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. अशा परिस्थितीत सुधाकरराव नाईक यांनी दशकांपूर्वी दिलेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. जलसंधारणाची कामे किती झाली यापेक्षा ती किती परिणामकारक ठरली, पाणी किती काळ टिकले आणि पुढील पिढीसाठी आपण किती जलसाठा निर्माण केला, हा खरा प्रश्न आहे.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या अभियानाच्या माध्यमातून जलसंधारणाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, माती आणि पाणी ही निसर्गाची अमूल्य संपत्ती असून त्यांचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

२१ ऑगस्टचा 'जलसंधारण दिन' त्यामुळे केवळ एका महान नेत्याच्या स्मरणाचा दिवस न राहता महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी सामूहिक संकल्पाचा दिवस ठरला पाहिजे. सुधाकरराव नाईक यांना खरी आदरांजली त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात नाही, तर त्यांच्या विचारांना कृतीची जोड देण्यात आहे. प्रत्येक गावात जलस्रोत जपला, प्रत्येक शेतात पाण्याचा थेंब अडविला, प्रत्येक शाळेत जलसंधारणाचा संस्कार रुजविला आणि प्रत्येक नागरिकाने पाण्याची जबाबदारी स्वीकारली, तरच 'जलसंधारण दिना'चा खरा उद्देश साध्य होईल.

**माती वाचली तर शेती वाचेल, पाणी जपले तर जीवन सुरक्षित राहील आणि लोकसहभाग वाढला तर महाराष्ट्र जलसंपन्न बनेल. चला, सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणाच्या विचारांना कृतीची जोड देऊया—'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा!'**

• • •

## नागपूर पदवीधर मतदारसंघासाठी भाजपची मोर्चेबांधणी




**प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या बैठकांचा झंझावात**

■ नागपूर (दै. संध्या)

नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी विदर्भाचा दोन दिवसीय झंझावाती दौरा करत संघटनात्मक बैठकांच्या माध्यमातून निवडणुकीच्या तयारीला वेग दिला. त्यांच्या या दौऱ्यानंतर आता भाजपची संघटनात्मक यंत्रणा नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरली आहे. या दोन दिवसीय दौऱ्यादरम्यान रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नागपूर ग्रामीण (रामटेक), चंद्रपूर महानगर व ग्रामीण, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर महानगर, काटोल आणि वर्धा या संघटनात्मक जिल्ह्यांच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये संघटनात्मक बांधणी, निवडणूक नियोजन आणि कार्यपद्धतीचा आढावा घेत चव्हाण यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटित आणि नियोजनबद्ध पद्धतीने निवडणूक लढवण्याचे मार्गदर्शन केले. चंद्रपूरमध्ये झालेल्या बैठकीदरम्यान ब्रह्मपुरी येथील, १९८० पासून पक्षकार्यासाठी समर्पित असणाऱ्या प्रा. शेख सर यांचा चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. "प्रा. शेख सर यांच्यासारखे देवदुर्लभ कार्यकर्ते हे भाजपा परिवाराचे खरे आधारस्तंभ आहेत. अशा निष्ठावंत ज्येष्ठांच्या संघर्षातूनच आज पक्षाचा हा भव्य वटवृक्ष साकार झाला आहे." असे यावेळी रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. या दौऱ्यादरम्यान रामटेकचे जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत, आ. कीर्तिकुमार (बंटी) भांगडीया, माजी आ. अतुल देशकर, ज्येष्ठ नेते किसन नागदेवे, माजी आ. कृष्णा गजभिये आणि आ. विनोद अग्रवाल यांच्या निवासस्थानी/कार्यालयाला सदिच्छा भेटी देत रविंद्र चव्हाण यांनी स्थानिक कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला.

## एनएचसी फुड्सची आर्थिक वर्षात दमदार कामगिरी

■ महसुलात वार्षिक आधारावर २३५ टक्क्यांची वाढ, तो पोहचला ३६९.६९ कोटी रुपयांवर

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

एनएचसी फुडस् या सरकारमान्य 'थ्री-स्टार एक्सपोर्ट हाऊस' आणि अन्न प्रक्रिया कंपनीने आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत दमदार कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचा लेखापरीक्षण न झालेला एकत्रित परिचालन महसूल वार्षिक आधारावर २३४.५४ टक्क्यांनी वाढून ३६९.६९ कोटी रुपये झाला आहे. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत हा महसूल ११०.५१ कोटी रुपये होता. दरम्यान, २०२७ मध्ये पहिल्या तिमाहीत इबिआयटीडीए २१.२९ कोटी रुपये राहिला, जो २०२६ मधील पहिल्या तिमाहीत ३.४८ कोटी रुपयांच्या तुलनेत ५१२.४३ टक्क्यांची वाढ दर्शवतो.

लेखापरीक्षण न झालेला एकत्रित नफा १६.९९ कोटी रुपये नोंदवला गेला, जो २०२६ च्या पहिल्या तिमाही मधील १.६७ कोटी रुपयांच्या तुलनेत ९१९.८१ टक्क्यांची वाढ दर्शवतो. 'बेसिक ईपीएस' (ईपीएस) प्रति शेअर ०.२६ रुपये राहिला, जो २०२६ मध्ये पहिल्या तिमाहीत प्रति शेअर ०.०३ रुपये होता.

आर्थिक वर्ष २०२७ मधील पहिल्या तिमाहीच्या कामगिरीबद्दल बोलताना एनएचसी फुडस् लि. चे व्यवस्थापकीय संचालक सत्यम शिरीषचंद्र जोशी म्हणाले, "आम्हाला २०२७ मधील पहिल्या तिमाहीच्या दमदार कामगिरीचा आनंद आहे, ज्यामध्ये महसूल आणि परिचालन नफा यामध्ये लक्षणीय वाढ दिसून आली. ही तिमाही आमच्या व्यवसायाच्या कामकाजातील सातत्यपूर्ण गती दर्शवते, ज्याला वाढलेली व्याप्ती आणि उत्तम अंमलबजावणीची जोड मिळाली आहे. आम्ही आमची उत्पादने अधिक सक्षम करण्यावर, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील उपस्थिती वाढवण्यावर आणि कामकाजाची कार्यक्षमता सुधारण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत. मजबूत पाया आणि व्यवसायाच्या वाढत्या संधींच्या जोरावर, आम्ही शाश्वत विकास साधण्यासाठी आणि आमच्या भागधारकांसाठी दीर्घकालीन मूल्य निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहोत.

आर्थिक वर्ष २०२६ साठी, कंपनीने १२.३२ कोटी रुपयांचा लेखापरीक्षण न झालेला एकत्रित नफा नोंदवला. २०२६ या वर्षातील परिचालन महसूल ६०१.३१ कोटी रुपये होता, जो २०२५ या वर्षात ३४७.८८ कोटी रुपयांच्या तुलनेत ७२.८५ टक्क्यांची वार्षिक वाढ दर्शवतो.

आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ईबीआयटीडीए १६.४२ कोटी रुपये होता. त्या तुलनेत २०२६ मध्ये ही रक्कम २१.९५ कोटी रुपये इतकी झाली. ज्यामुळे वार्षिक आधारावर ३३.६८ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. तसेच 'बेसिक ईपीएस' प्रति शेअर ०.२० रुपये इतका राहिला.

कंपनीने अलीकडेच मे.'ग्लोबल फोकस फंड'ला १०,४१,७७,०४० पूर्णपणे पेड-अप इक्विटी शेअर्सचे वाटप करून आपला भांडवली पाया बळकट केला आहे. हे वाटप एकूण ११ लाख अमेरिकन डॉलर्स (यूएसडी) मूल्याच्या ११ एफसीसीबी (FCCBs) च्या अंशतः रूपांतरणामुळे करण्यात आले. या रूपांतरणानंतर, कंपनीचे पेड-अप इक्विटी शेअर भांडवल वाढून ७६.१९ कोटी रुपये झाले आहे. पुढील एका धोरणात्मक घडामोडीत, संचालक मंडळाने 'अॅग्रीकनेक्ट सोल्युशन्स प्रा. लि.' मधील प्रस्तावित गुंतवणूक आणि अधिग्रहणासाठी 'लेटर ऑफ इंटेंट'ला मंजुरी दिली व त्यावर स्वाक्षरी केली. ही कंपनी कृषी-मालाचा पुरवठा आणि व्यापार करण्याच्या व्यवसायात कार्यरत आहे. हा प्रस्तावित व्यवहार कंपनीला कृषी-माल क्षेत्रात आपली उपस्थिती वाढवण्याची आणि आपल्या व्यावसायिक कामकाजात अधिक विविधता आणण्याची संधी देतो.

एनएचसी फूड्स लि. ही सरकारमान्य 'थ्री-स्टार एक्सपोर्ट हाऊस' असून ती संपूर्ण आणि दळलेले मसाले, डाळी, कडधान्ये, धान्य, तेलबिया, इतर कृषी-माल आणि विविध खाद्यपदार्थांवर प्रक्रिया करणे, त्यांची खरेदी करणे आणि निर्यात करण्याच्या व्यवसायात कार्यरत आहे.

कंपनी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये सेवा पुरवते आणि आपल्या खरेदी, प्रक्रिया व वितरण क्षमता बळकट करण्यासोबतच दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करते. एनएचसी फूड्स कृषी-माल मूल्य साखळीतील धोरणात्मक उपक्रमांद्वारे आपला व्यवसाय विस्तारत देखील आहे.

## बजाज जनरल इन्श्युरन्सकडून 'प्रो-शील्ड' आणि 'व्ही-पे 2.0' सादर

■ पुणे (दै. संध्या)

बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांसाठी विशेष पॅकेज्ड मोटार विमा उत्पादन 'प्रो-शील्ड', तसेच आधुनिक आणि जोडणीक्षम वाहनांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन 'व्ही-पे 2.0' हे नव्या पिढीचे मोटार विमा उत्पादन सादर केले आहे. संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांना वारंवार बदल्या, विविध ठिकाणी नियुक्त्या, महत्त्वाच्या मोहिमा आणि कुटुंबापासून दीर्घकाळ दूर राहणे अशा परिस्थितींना सामोरे जावे लागते. त्यांच्या जीवनशैलीतील या विशेष गरजा लक्षात घेऊन 'प्रो-शील्ड'ची रचना करण्यात आली आहे.

**पुणे जिल्हा परिषद, बांधकाम विभाग (दक्षिण)**

**ई - निविदांतर्गत खुली बी १ निविदा सुचना क्रं. २४ सन २०२६-२७**

पुणे जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत, वेलस्ली रोड, कॅम्प पुणे-१ यांच्या वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे शिरूर - ३२ एकूण - ३२ कामांची ई-निविदा http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. १३/०८/२०२६ रोजी स. १०.०० वा.** प्रसिध्द करणेत आल्या आहेत. ई निविदेबाबत संपूर्ण माहिती http:mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

सही/- कार्यकारी अभियंता (दक्षिण) जिल्हा परिषद, पुणे

सही/- अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे

जा.क्र. जि. प. बांध/ले-६/१४२/२०२६
पुणे दि. १४/०८/२०२६

## प्राइम व्हिडिओच्या 'वी गॉट यू, गर्ल' मध्ये बरखा सिंग आणि आयशा अहमद यांची गर्ल-गँग एनर्जी दिसणार

**एमएक्स ओरिजिनलचा प्रीमियर १८ ऑगस्ट रोजी प्राइम व्हिडिओवर**

■ मुंबई (दै. संध्या)

मनात साचलेल्या भावना मैत्रिणींसमोर मोकळ्या करायच्या आहेत? फॅशनचा एखादा प्रश्न सोडवण्यासाठी मदत हवीय किंवा थोडा आत्मविश्वास वाढवायचाय? वी गॉट यू, गर्ल! एक्सक्लुझिव्ह ओरिजिनल्ससाठी भारतातील सर्वात मोठी स्ट्रीमिंग सेवा असलेल्या प्राइम व्हिडिओने 'वी गॉट यू, गर्ल' या एमएक्स ओरिजिनल सीरिजची घोषणा केली आहे. अभिनेत्री बरखा सिंग आणि आयशा अहमद या सीरिजचे सूत्रसंचालन करणार आहेत. महिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा उत्सव साजरा करणाऱ्या या 15 एपिसोड्सच्या शोमध्ये तज्ज्ञांचा सल्ला, मैत्रिणींमधील हलक्याफुलक्या गप्पा आणि प्रत्यक्ष आयुष्यातील मेकओव्हर्स यांची सांगड घालण्यात आली आहे. महिलांना




स्वतःचे व्यक्तिमत्त्व कायम ठेवून आपल्यासाठी नेमके काय योग्य आहे, हे ओळखण्यास मदत करणे हा या शोचा उद्देश आहे. दर मंगळवारी असे एकूण पाच आठवडे तीन नवीन एपिसोड्स प्रदर्शित करण्यात येणार आहेत. 'वी गॉट यू, गर्ल'च्या प्रत्येक एपिसोडमध्ये एका वेगळ्या महिलेची स्टाइल, ब्युटी किंवा आत्मविश्वासाशी संबंधित समस्या आणि त्यावर ती कशा प्रकारे मात करते, हे पाहायला मिळणार आहे. बरखा आणि आयशासोबत एटिकेट अँड ट्रान्सफॉर्मेशन कोच माणिक कौरही या शोमध्ये सहभागी होणार आहेत. त्वचेचा अंडरटोन, केसांचा पोत आणि व्यक्तीला शोभणारे रंग यांपासून व्यक्तिमत्त्व, जीवनशैली आणि बजेटपर्यंत विविध बाबींचा विज्ञान आणि तर्काच्या आधारे विचार करण्यात येणार आहे. त्याला गर्ल-स्क्वॉड एनर्जीची मजेदार जोड देत या तिघी प्रत्येक महिलेला तिच्या आवडीचा मेकओव्हर निवडण्यास मदत करणार आहेत. या प्रवासाचा अंतिम टप्पा म्हणजे मेकओव्हर असला, तरी तिथपर्यंत पोहोचण्याचा प्रवासच सर्वाधिक मजेदार आहे. 'हे माझ्यासाठी योग्य आहे असं मला वाटत नाही'पासून 'अरे, मी हे याआधी का करून पाहिलं नाही?'पर्यंत प्रत्येक एपिसोडमध्ये मनमोकळी मतं, अनपेक्षितपणे लागलेले नवे शोध आणि हलक्याफुलक्या गप्पा पाहायला मिळणार आहेत.

महाराष्ट्र शासन

**आदिवासी विकास विभाग**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
http://trti.maharashtra.gov.in

**JEE (Mains & Advanced) and NEET प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षण तयारीसाठी अनिवासी प्रशिक्षण (ऑफलाईन) देण्याकरिता खाजगी नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेची निवड करणेबाबत.**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे कार्यालयाच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या इ. १२ वी नंतर ११ महिन्याच्या कालावधीकरिता 'परीक्षेची पुनर्तयारी (Repeater)' करणारे ५०० उमेदवारांना ऑफलाईन स्वरुपात JEE (Mains & Advanced) किंवा NEET प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजने अंतर्गत खाजगी नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यात प्रशिक्षण देण्यासाठी खाजगी नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांची निवड ई-निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येणार आहे.

त्यानुसार निविदासंच, निविदेसंबंधीचा सविस्तर तपशील, सेवापुरवठादार संस्थांची अर्हता व पात्रतेचे निकष इ. व तत्सम माहितीकरिता अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in ला भेट द्यावी. अर्हता प्राप्त प्रशिक्षण संस्थांनी आपले प्रस्ताव ऑनलाईन सादर करावेत.

सदर योजनेबाबत अधिक माहितीकरिता या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ http://trti.maharashtra.gov.in ला भेट द्यावी.

अर्हतेनुसार पात्र सेवापुरवठादार संस्थेचे निवड करण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे राहतील.

सही/-
(निलेश सागर, भा.प्र.से)
आयुक्त

विमाका/पुणे/जाहि./१२८/२०२६-२७

## जाहीर नोटीस

ॲड. किरण सुधीर मते, ऑफिस नं. ६ - साकार नगरी, जुन्नर रोड, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे यांजतर्फे आमचे अशिल श्री. महादू बबड्या गोरडे तर्फे जाहीर नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणे,

तमाम नागरिकांस विशेषतः गाव मौजे शिंगवे, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील रहिवासी यांस तसेच आजूबाजूचे परिसरातील रहिवासी यांस नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद परिशिष्ठ मध्ये नमूद केलेल्या मिळकती संदर्भात आमचे आशिल यांची वडीलोपार्जित व सामाईक मालकी हक्क, ताबे वहिवाटची मिळकत आहे. सदरील मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. तसेच मिळकतीतील इतर सहदायकांचा हिस्सा व अधिकार खरेदी घेण्याचा आग्रहक्काने आमचे अशिलास प्रथमतः अधिकार आहे. सदरील मिळकतीचे संदर्भात अबग/५४८४/२०२६ हा दस्त अस्तित्वात आणलेल्या व्यक्तींना व इतर सामाईक हिस्सेदार यांस त्यांचा हिस्सा विक्री करावयाचा आहे अशी खात्रीलायक माहिती आमचे अशिलांस मिळालेली आहे. त्यामुळे कोणीही मिळकतीचे संदर्भात कोणताही हस्तांतरक्षम दस्त अस्तित्वात आणून आणू नये. यदाकदाचित कोणीही मिळकती संदर्भात दस्त अस्तित्वात आणल्यास त्यास मिळकतीचा ताबा मिळणार नाही व खरेदी केलेला हिस्सा देखील आमचे अशिलांचे हिश्यावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

परिशिष्ठ

मिळकतीचे वर्णन – मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी ता. आंबेगाव, जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती आंबेगाव, मा. दुय्यम निबंधक सो. घोडेगाव यांचे हद्दीतील येथील गाव मौजे शिंगवे येथील शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे,

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९५९ | ००.८० | १.५३ |
| | पो. ख. ००.०४ | |
| | एकूण ००.८४ | |

येणेप्रमाणे शेतजमीन मिळकत, त्यातील अंगभूत वस्तु, जाणे येण्याचे वहिवाटीचे सर्व हक्क, सर्व इजमेंटरी रईट्ससह दरोबस्त मिळकत.

शिंगवे
दि. १४/०८/२०२६

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
ॲडव्होकेट
श्री. किरण सुधीर मते
महा./८५००/२०२१



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६
दैनिक संध्या



## थोडक्यात पण महत्वाचे




### वाकडमध्ये राष्ट्र सेविका समितीच्या वतीने १०० हून अधिक वृक्षांची लागवड

**पिंपरी : दैनिक संध्या**

राष्ट्र सेविका समितीच्या ९० वर्षांच्या गौरवशाली सेवावाटचालीचे औचित्य साधून राष्ट्र सेविका समिती, अहिल्या शाखा वाकड, पुणे यांच्या वतीने उत्कर्ष चौक ते छत्रपती चौक, वाकड या मार्गावर १०० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या वृक्षारोपण मोहिमेत समितीच्या महिला सेविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा आणि पर्यावरणाचे रक्षण करा' हा संदेश देत पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात आली. या प्रसंगी राष्ट्र सेविका समितीच्या सेविका तसेच प्रभाग क्रमांक २६ च्या नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे उपस्थित होत्या. राष्ट्र सेविका समितीच्या संस्कारातून मिळालेली राष्ट्रसेवा, समाजसेवा आणि पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा लोकप्रतिनिधी म्हणूनही पुढे नेत असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्र सेविका समितीने गेल्या ९० वर्षांत राष्ट्रभक्ती, समाजसेवा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा सातत्याने प्रसार केला आहे. त्याच सेवाभावी परंपरेचा भाग म्हणून हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. लावण्यात आलेली रोपे भविष्यात मोठ्या वृक्षांमध्ये रूपांतरित होऊन परिसरातील नागरिकांना शुद्ध हवा, सावली आणि हिरवाई प्रदान करतील. तसेच पुढील पिढ्यांसाठी निरोगी आणि संतुलित पर्यावरण निर्माण करण्यास हातभार लावतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. राष्ट्र सेविका समितीच्या ९० वर्षांच्या सेवावाटचालीतून राष्ट्रभक्ती, समाजसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक व्यापक व्हावा, तसेच सेवाभावाची भावना जनसेवेत अधिक प्रभावीपणे पुढे न्यावी, हीच या उपक्रमामागील प्रेरणा असल्याचे स्नेहा रणजित कलाटे यांनी नमूद केले.

### 'अवकारिका'च्या हिंदी ट्रेलर व पोस्टरचे महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते अनावरण

**पिंपरी : दैनिक संध्या**

स्वच्छ शहराच्या निर्मितीसाठी अहोरात्र झटणाऱ्या सफाई कामगारांचे कष्ट, त्यांचे शहरवासियांप्रती असलेले योगदान आणि स्वच्छतेबाबत प्रत्येक नागरिकाची जबाबदारी अधोरेखित करणाऱ्या 'अवकारिका' या सामाजिक आशयाच्या हिंदी चित्रपटाच्या ट्रेलर व पोस्टरचे अनावरण महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वच्छ भारत मिशनच्या संकल्पनेवर आधारित या चित्रपटाच्या माध्यमातून सफाई कामगारांच्या जीवनाकडे आणि त्यांच्या योगदानाकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला आहे. शहर स्वच्छ दिसावे, नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ व सुंदर असावा, यासाठी सफाई कामगार दररोज प्रतिकूल परिस्थितीत काम करत असतात. मात्र, त्यांच्या या श्रमांकडे अनेकदा दुर्लक्ष होते. या अदृश्य श्रमांना समाजासमोर आणून सफाई कामगारांप्रती आदराची भावना निर्माण करण्यासोबतच 'स्वच्छता ही केवळ त्यांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे', हा विचार रुजविण्याचा प्रयत्न 'अवकारिका'च्या माध्यमातून करण्यात आला आहे. यावेळी नगरसदस्या सारिका मासुळकर, अभिनेता रोहित पवार, दिग्दर्शक सीए अरविंद भोसले, निर्माते भरत टिळेकर व अरुण जाधव यांच्यासह चित्रपटाशी संबंधित कलाकार, तंत्रज्ञ आणि मान्यवर उपस्थित होते. सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयाला मनोरंजन आणि कलात्मक अभिव्यक्तीची जोड देत नागरिकांच्या मनाला स्पर्श करणारा संदेश या चित्रपटातून मांडण्यात आला आहे. विशेष म्हणजे, 'अवकारिका'ची टीम केवळ पडद्यावर स्वच्छतेचा संदेश देण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. सीए अरविंद भोसले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अजमेरा येथील एका उद्यानाची स्वच्छता आणि सुशोभीकरण करून त्याचा प्रत्यक्ष कायापालट केला आहे. नागरिकांच्या सहभागातून हे उद्यान आज स्वच्छता, खेळ, व्यायाम आणि विविध सामाजिक उपक्रमांसाठी उपयोगी ठरत आहे. त्यामुळे चित्रपटातून मांडलेला विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा आदर्शही या टीमने समाजासमोर ठेवला आहे. याप्रसंगी महापौर रवि लांडगे यांनी चित्रपटाच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करत सफाई कामगारांच्या योगदानाचा गौरव केला.

### मृत कामगाराच्या पत्नीच्या आत्महत्ये प्रकरणी सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल

**पिंपरी : दैनिक संध्या**

मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागेश गायकवाड यांच्या पत्नी सोनाली गायकवाड यांच्या आत्महत्येप्रकरणी त्यांच्या सासरच्या मंडळींविरुद्ध भोसरी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोनाली गायकवाड यांनी परवा सायंकाळी मोशी येथील बोऱ्हाडेवाडी परिसरातील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेनंतर त्यांच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 108 व 352 अन्वये गुन्हा नोंदविला आहे. फिर्यादीनुसार, पती नागेश गायकवाड यांच्या मृत्यूनंतर सोनाली यांना वारंवार टोमणे मारले जात होते. तसेच पतीच्या मृत्यूनंतर मिळालेल्या आर्थिक मदतीच्या रकमेसंदर्भात घरात वाद होत होते. याशिवाय त्यांना दोन मुली असल्याच्या कारणावरूनही मानसिक त्रास व छळ सहन करावा लागत असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या सततच्या मानसिक छळामुळे सोनाली गायकवाड यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. दरम्यान, भोसरी एमआयडीसी पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### महापालिका कर्मचाऱ्यांना बोनस देण्याचा मार्ग मोकळा

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना दरवर्षी दिवाळीचा बोनस व सानुग्रह अनुदान देण्यात येते. अधिकारी व कर्मचाऱ्यांना 8.33 टक्के प्रथा बोनस आणि 25 हजार हजार रुपये सानुग्रह अनुदान दिले जाते. त्यासाठी सन 2025-26 ते सन 2029-30 असे पाच वर्षांसाठी करारनामा करण्यास तसेच, त्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाने दिवाळी प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान देण्याबाबत पाच वर्षांचा करारनामा करण्याची मागणी केली होती. त्यानुसार, कामगार कल्याण मंडळाने स्थायी समितीसमोर तसा प्रस्ताव ठेवला होता. महापालिका आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच, शिक्षण विभागासह वैद्यकीय विभागाच्या अधिकारी व कर्मचारी आणि निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान दरवर्षी दिले जाते. त्यात 8.33 टक्के प्रथा बोनस आणि 25 हजार रुपये सानुग्रह अनुदान दिले जाते. या प्रस्तावाला समितीने उपसूचना दिली आहे.

# वाहतूक कोंडीमुक्त PMR साठी एकत्रित प्रयत्नांचा संकल्प

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची महत्त्वपूर्ण बैठक, वाहतूक प्रश्नांवर विविध संघटनांसोबत सविस्तर चर्चा



**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने सार्वजनिक खासगी भागीदारी (डीबीएफओटी) तत्त्वावर ओल्या कचऱ्यापासून बायो-सीएनजी निर्मितीचा ३७५ टन क्षमतेचा प्रकल्प मोशी कचरा डेपोत राबवण्यात येत आहे. भाजपाच्या स्थानिक नगरसेवकांचा डेपोत कचरा टाकण्यास विरोध असताना तेथे नवीन प्रकल्पाचा घाट कोणाच्या भल्यासाठी घातला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव पुढे करून खर्चिक प्रकल्पांच्या नावाने महापालिकेची लूट करण्याचा घाट घातला जात आहे, असा गंभीर आरोप विरोधकांनी सत्ताधारी भाजपवर केला आहे.

पत्रकार परिषदेत स्थायी समितीचे सदस्य सुलभा उबाळे व संदीप वाघेरे यांनी सांगितले की, महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ९ कर्मचाऱ्यांचा बळी गेला. ती घटना ताजी असताना मोशी डेपोतच नवीन प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्यावरून विरोधकांनी आयुक्तांसह सत्ताधारी भाजपाला धारेवर धरले. कचऱ्यातून मलिदा लाटण्यासाठी मूळ दरापेक्षा तिपटीपेक्षा अधिक दराने राबवला जात आहे. त्यातून महापालिकेची लूट होणार आहे. मुख्यमंत्र्यांचे नाव पुढे करून इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांनंतर ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्मितीचा प्रकल्पाचा घाट घातला आहे. सीएनजी प्रकल्पासाठी ठेकेदाराला न पोसता महापालिकेने स्वत: हा प्रकल्प उभारावा. त्यातून महापालिकेस दरवर्षी १ कोटी ७३ लाख ३७ हजार ५०० रुपये उत्पन्न मिळेल. तसेच, अनेक कंपन्या हे काम मोफत तयार करण्यासाठी तयार आहेत. त्याकडे दुर्लक्ष करून महापालिका खड्ड्यात टाकण्याचा डाव सत्ताधारी भाजपाने चालवला आहे, असा आरोप उबाळे व वाघेरे यांनी केला. दोषी मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, तसेच सल्लागार टंडन यांनी तो प्रकल्प तयार केला आहे. टंडन याला आतापर्यंत ३० कोटी रुपये शुल्क दिले गेले आहे. दोषी अधिकाऱ्यांचे प्रकल्प प्रशासनाने राबवू नये. विरोध डावलून सत्ताधाऱ्यांनी प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतल्यास जनआंदोलन छेडले जाईल. मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करू. प्रसंगी न्यायालयात दाद मागू, असा इशारा त्यांनी दिला आहे. या वेळी सदस्य विकास साने उपस्थित होते...असा आहे प्रकल्प

मोशी कचरा डेपोत हॉटेल वेस्टपासून सीएनजी निर्मितीचा प्रकल्प सुरू आहे. आता, तेथेच घरगुती ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्मितीचा ३७५ टन क्षमतेचा प्रकल्प सुरू केला जाणार आहे. ते काम एसएमसी इन्फ्रा. प्रा. लि. या ठेकेदाराला १६ वर्षे ९ महिने कालावधीसाठी देण्यास महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी मान्यता दिली आहे. तो प्रस्ताव मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवला जाणार आहे. ऐनवेळी मंजुरी देऊन त्या प्रस्तावाला गुपचूप मंजुरी देण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून सुरू असल्याचा आरोप सुलभा उबाळे व संदीप वाघेरे यांनी केला आहे. त्या ठेकेदाराला ३ हजार ६६१ रुपये प्रतिटन दराने टिपिंग चार्जेस देण्यात येणार आहे.

### इंडस्ट्रियल टाउनशिप'चा व्यापक दृष्टिकोन

हिंजवडीसह तळेगाव-चाकण-खेड औद्योगिक क्षेत्राचा केवळ वाहतूक प्रश्न सोडविण्यापुरता विचार न करता, त्याचा 'इंडस्ट्रियल टाउनशिप' म्हणून नियोजनबद्ध विकास करण्याची गरज आहे. उद्योगांना आवश्यक रस्ते, सार्वजनिक वाहतूक, वीज, पाणी, नागरी सुविधा आणि वाहतूक व्यवस्थापन यांचा एकात्मिक आराखडा तयार झाल्यास या क्षेत्रातील उद्योग आणि रोजगाराला मोठी चालना मिळू शकते, असा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला.

### अराजकीय समिती स्थापण्याचा प्रस्ताव

वाहतूक प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा संस्थेचा विषय नसून नागरिक, कामगार, उद्योजक आणि प्रशासन या सर्वांशी संबंधित असल्याने नोडल अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अराजकीय समन्वय समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव पुढे आला. या समितीच्या माध्यमातून प्रलंबित कामांचा नियमित आढावा, कामाचा वेग, दर्जा आणि आवश्यक भूसंपादन यांचा पाठपुरावा करण्याचे निश्चित करण्यात आले.

### मुख्यमंत्र्यांसोबत पुन्हा बैठक घेणार

या बैठकीतील प्रमुख मुद्दे घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पुन्हा बैठक घेण्याचा निर्धार करण्यात आला. प्रस्तावित रस्त्यांसाठी आवश्यक भूसंपादनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे, वाहतूक पोलिस व वॉर्डनचे मनुष्यबळ वाढविणे, तसेच ग्रामपंचायत आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वय साधून एकत्रित पाठपुरावा करण्यावरही भर देण्यात आला.

"हिंजवडी आयटी हब आणि तळेगाव-चाकण-खेड औद्योगिक पट्टा हा केवळ पुणे जिल्ह्याचा नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचा आहे. वाहतूक कोंडीमुळे उद्योग, कामगार आणि नागरिकांना त्रास होणार असेल, तर ही परिस्थिती स्वीकारता येणार नाही. शासन, प्रशासन, उद्योजक, नागरिक आणि विविध संघटनांना सोबत घेऊन ठोस, कालबद्ध आणि परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी आमचा सातत्यपूर्ण पाठपुरावा राहील. पुणे महानगर प्रदेश (PMR) ला वाहतूक कोंडीमुक्त आणि उद्योगस्नेही बनविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा हा संकल्प आहे.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## मंत्रीपदे येत-जात राहतात, लोकसेवा महत्त्वाची : दत्ता भरणे

**■ पिंपरी (दै. संध्या)**

'लांब पल्ल्यांच्या यात्रा करून देव शोधण्यापेक्षा जिवंतपणी आपल्या आई-वडिलांची सेवा करणे, हीच खरी ईश्वरसेवा आहे. संत सावता महाराजांनी ७५० वर्षांपूर्वी दिलेल्या 'कांदा मुळा भाजी, अवघी विठाबाई माझी' या संदेशातून आपल्या कष्टालाच देव मानण्याची शिकवण मिळते. आयुष्यामध्ये पदे येत-जात राहतात. आमदार, मंत्रीपद कायमचे नाही. परंतु, पदावर असताना सामान्य गोरगरीब जनतेला त्याचा किती फायदा झाला, हेच अखेरपर्यंत टिकून राहते. पदांच्या माध्यमातून लोकसेवा महत्त्वाची', असल्याचे विधान राज्याचे कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी केले.



महात्मा ज्योतिबा फुले मंडळाच्या वतीने संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७३१ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्यावेळी कृषीमंत्री भरणे बोलत होते. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झालेल्या कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार शंकर जगताप, बळीराम सिरस्कार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे बंधू जीएसटीचे उपायुक्त नारायण गोरे, माजी महापौर अपर्णा डोके, नगरसेविका रेश्मा भुजबळ, शीतल वर्णेकर, ज्येष्ठ नेते वसंतनाना लोंढे, मंडळाचे अध्यक्ष हणमंत माळी, प्रशांत डोके, केंब्रिज युनिव्हर्सिटीचे संस्थापक धनंजय वर्णेकर, शिक्षण मंडळाचे माजी सभापती चेतन भुजबळ, उद्योजक संजय जगताप, मंडळाचे माजी उपाध्यक्ष नरेश शेवते, राजेंद्र करपे, माजी नगरसेवक मोहन भूमकर, वाकडचे माजी सरपंच राजाभाऊ भुजबळ, माजी नगरसेवक सुरेश म्हेत्रे, काळूराम गायकवाड, भरत आल्हाट, विरेंद्र कुदळे, विजय दर्शले यावेळी उपस्थित होते.

कृषीमंत्री भरणे म्हणाले, 'गेली २४ वर्षे अविरतपणे हा कार्यक्रम राबवून समाजबांधवांना एकत्र आणणे, त्यांच्या अडचणी सोडवणे आणि चांगल्या कामाची पावती देणे ही कौतुकास्पद बाब आहे. प्रत्येक वर्षी हा कार्यक्रम घेऊन पुरस्कार दिले जातात. यातून पुरस्कारार्थींना चांगल्या प्रकारची प्रेरणा, एक ऊर्जा मिळते.

## मीडियाचा वापर व्यक्तिमत्त्व विकासासाठी करा

**■ पिंपरी (दै. संध्या)**

शिक्षण हे स्वतःला सक्षम करण्याचे आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देण्याचे माध्यम आहे. तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाचा वापर मनोरंजन शिवाय ज्ञान, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी करावा. तसेच व्यावसायिक जीवनात पदार्पण केल्यानंतर समाजासाठी योगदान देण्याची भावना जोपासावी असे मार्गदर्शन पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समिती अध्यक्ष आणि इंडियन शुगर मिल्स असोसिएशन सदस्य अंकिता पाटील ठाकरे यांनी केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये स्कूल ऑफ फार्मसी, स्कूल ऑफ सायन्सेस, पुणे डिझाईन स्कूल आणि पुणे स्कूल ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा 'दीक्षारंभ २०२६-२७' या स्वागत सोहळ्यात ठाकरे बोलत होत्या.

यावेळी ज्येष्ठ चित्रपट अभिनेते रझा मुराद, स्वतंत्र सार्वजनिक आरोग्य सल्लागार डॉ. शंकर दापेकर, पीसीइटी चे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू चे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, पीसीयूचे संचालक, प्रशिक्षण व प्लेसमेंट डॉ. शितलकुमार रवंदळे, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते. यावेळी 'स्टुडंट मॅन्युअल' चे अनावरण करण्यात आले.

# 'नाशिक फाटा-खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर'साठी भूसंपादन 'मार्किंग' सुरू!

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवडसह चाकण आणि खेडच्या औद्योगिक पट्ट्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या नाशिक फाटा-खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला आता गती मिळाली आहे. या प्रकल्पासाठी नगरविकास विभागाकडून आज मार्गाचे मार्किंग सुरू झाले असून, भूसंपादन प्रक्रियेलाही वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.

नाशिक फाटा-खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा केवळ वाहतूक कोंडी सोडविणारा प्रकल्प नसून पुणे-पिंपरी-चिंचवड-चाकण-खेड या संपूर्ण औद्योगिक पट्ट्याच्या विकासाला गती देणारी महत्त्वाची पायाभूत सुविधा आहे. या मार्गामुळे नाशिक फाटा, भोसरी, मोशी, चाकण आणि खेड परिसरातील वाढत्या वाहतुकीचा ताण कमी करण्यास मदत होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी वेगाने व्हावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाचे भूसंपादन पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी, यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत प्रकल्पाला गती देण्याची भूमिका त्यांनी घेतली. तसेच, विधानसभा अधिवेशनातही हा मुद्दा सातत्याने लावून धरला आहे. आता नगरविकास विभागाकडून मार्गाचे मार्किंग सुरू झाल्याने आणि भूसंपादन प्रक्रियेला वेग मिळाल्याने लांडगे यांच्या पाठपुराव्याला प्रत्यक्ष प्रशासकीय गती मिळाल्याचे चित्र आहे. चाकण औद्योगिक पट्ट्यात ऑटोमोबाईल, इंजिनिअरिंग, उत्पादन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील मोठ्या उद्योगांची संख्या आहे. मात्र, वाढती वाहतूक कोंडी आणि अपुरी रस्ते क्षमता यामुळे उद्योगांच्या वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे. एलिव्हेटेड कॉरिडॉरमुळे लांब पल्ल्याची वाहतूक अधिक वेगाने पुढे जाण्यास मदत होणार असून, उद्योगांसाठी वेळ, इंधन आणि लॉजिस्टिक्स खर्चात बचत होण्याची शक्यता आहे.





"नाशिक फाटा-खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा केवळ वाहतूक कोंडी सोडविणारा प्रकल्प नाही, तर पिंपरी-चिंचवड, चाकण आणि खेडच्या औद्योगिक विकासाला नवी गती देणारा महत्त्वाचा वाहतूक-कणा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाचे भूसंपादन आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. आज नगरविकास विभागाकडून मार्किंग सुरू झाले असून भूसंपादन प्रक्रियेलाही गती मिळाली आहे. हा प्रकल्प लवकरात लवकर प्रत्यक्षात यावा आणि पुणे महानगर प्रदेशाच्या विकासाला नवी दिशा मिळावी, यासाठी आमचा पाठपुरावा यापुढेही कायम राहील."

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.


## थोडक्यात पण महत्वाचे



### गर्भवती महिला,बालकांच्या आरोग्यास प्राधान्य : राजेंद्र गावडे

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

शिरूर तालुक्याच्या पश्चिमेकडील कवठे येमाई येथील जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्रात गर्भवती महिला, बालके आणि गरजू रुग्णांना उत्कृष्ट आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे यांनी दिले.कवठे येमाई प्राथमिक आरोग्य केंद्रातील नवीन आधुनिक सुविधायुक्त इमारतीच्या बांधकामाची पाहणी नुकतीच करण्यात आली. यावेळी जन आरोग्य समितीची सभा केंद्रात पार पडली. उपस्थित मान्यवरांनी आरोग्य केंद्रातील विविध सुविधांबाबत चर्चा केली. सभेस जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे, पंचायत समिती सदस्य कांचन सांडभोरे, पांडुरंग भोर, रामदास सांडभोरे, रितेश शहा, अविनाश पोकळे, गुलाब वागदरे, विठ्ठल मुंजाळ यांच्यासह तंटामुक्ती उपाध्यक्ष बबुशा पाटील कांदळकर उपस्थित होते. यावेळी राजेंद्र गावडे यांनी आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा तसेच औषधांचा पुरेसा पुरवठा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. गर्भवती महिला, बालके आणि गरजू रुग्णांना वेळेत व दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी,यासाठी आरोग्य केंद्राच्या कामकाजाला प्राधान्य देण्याचे त्यांनी सांगितले. नवीन इमारतीमुळे परिसरातील नागरिकांना आधुनिक आणि अधिक चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्यास मदत होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



### साईलक्ष्मी पतसंस्थेची ८वी वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

**वडगाव कांदळी : दैनिक संध्या**

साईलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित वडगाव कांदळी (ता. जुन्नर) या पतसंस्थेची ८वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन प्रा. श्रीकांत पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेच्या विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना बहुमताने मंजुरी देण्यात आली. यावेळी व्हाईस चेअरमन रामदास पवार ,सचिव पोपट बढे,खजिनदार मंगेश घाडगे, संचालक सतीश पाचपुते, अतुल खेडकर ,नीलकंठ भोर, नवनाथ थोरात, ज्ञानेश्वर लांडगे, माऊली अडागळे, करीम इनामदार, लता भोर, पूजा मुटके ,उत्तम लांडगे, सुनील निलख मुख्य कार्यकारी अधिकारी मच्छिंद्र भोर ,पूजा भोर ,स्नेहल बढे, दैनंदिन ठेव प्रतिनिधी किरण ढोबळे, नितीन पाचपुते यांच्यासह संस्थापक दत्तूशेठ भोर, मार्गदर्शक बबनशेठ घाडगे, बाजार समितीचे संचालक नबाजी घाडगे ,खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अशोक बढे,वडगाव कांदळी गावच्या सरपंच उल्काताई पाचपुते उपसरपंच संजय खेडकर, ग्रामपंचायत सदस्य पंढरीनाथ पाचपुते, जिजाभाऊ भोर,सुवर्णा मुटके ,संगीता भोर, कांदळीचे उपसरपंच विशाल रेपाळे, अनिल भोर , बिरोबा दूध संस्थेचे चेअरमन संदेश पाचपुते , बबन सर पाचपुते,आर .डी. पाचपुते, शंकर साहेब पाचपुते , संदीपशेठ पाचपुते यांच्यासह सभासद, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सत्यवान थोरात, रंगनाथ पाचपुते, संजय खेडकर, संदीप पाचपुते, विशाल रेपाळे, आर . डी.पाचपुते यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्था कार्यक्षेत्र वाढवण्याची मंजुरी देण्यात आली. साईलक्ष्मी पतसंस्थेचे १हजार ५०८सभासद असून संस्थेच्या १२ कोटी ३लाख रुपयांच्या ठेवी असून ४ कोटी ५७ लाख गुंतवणूक केली आहे. संस्थेचा स्वनिधी १ कोटी ९४लाख रुपये आहे. संस्थेला २०२५-२६ या आर्थिक वर्षात २३लाख ९१ हजार रुपयांचा नफा झालेला आहे. संस्थेने कोणतेही बँकेचे कर्ज घेतलेले नाही संस्था स्थापनेपासून संस्थेला ऑडिट वर्ग अ मिळालेला आहे.

### प्रामाणिकपणाचा आदर्श! सापडलेली बॅग परत करून पोपट बोऱ्हाडे यांचे कौतुक

**वडगाव कांदळी : दैनिक संध्या**

पुणे-नाशिक महामार्गावरून प्रवास करणाऱ्या एल एक्स मराठी न्यूज चॅनलच्या संपादिका स्नेहल चौधरी व सुनील चौधरी राहणार जळगाव यांची बॅग पुणे नाशिक महामार्गावरून प्रवास करत असताना १४ नंबर, कांदळी (ता. जुन्नर) येथे पडली. मात्र गावातील पोपट बोऱ्हाडे यांच्या प्रामाणिकपणामुळे संपूर्ण ऐवज सुरक्षितपणे परत मिळाला. शनिवार दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ६ वाजता पोपट बोऱ्हाडे रस्त्याच्या कडेने जात असताना त्यांना एक बॅग आढळली. त्यांनी ती बॅग घरी आणली. त्यानंतर बॅगेतील मोबाईलवर स्नेहल चौधरी यांचा फोन आला. बॅगेत रोख रक्कम, महागडा मोबाईल, चावी, एटीएम कार्ड, आधार कार्ड असे सर्व मौल्यवान साहित्य सुरक्षित असल्याचे त्यांनी फोनवर सांगितले. रविवार दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी जळगावहून खास आलेल्या स्नेहल चौधरी व सुनील चौधरी यांनी १४ नंबर कांदळी येथे येऊन आपली बॅग ताब्यात घेतली. प्रामाणिकपणे वागल्याबद्दल त्यांनी पोपट बोऱ्हाडे यांचे अभिनंदन करून त्यांना बक्षीसही दिले.

# नाशिक फाटा-राजगुरुनगर एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या निविदेला गती

■ लोणी काळभोर : (दै. संध्या)


नाशिक फाटा ते राजगुरुनगर एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या कामाला गती देण्यासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू असून, पुढील १५ दिवसांत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील ३.८१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध होणार असल्याची माहिती शिरूरचे खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी दिली आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघातील रस्ते व दळणवळणाशी संबंधित विविध प्रश्नांसंदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची डॉ.कोल्हे यांनी नवी दिल्ली येथे भेट घेऊन त्यांना विविध मागण्या मांडण्यात आल्या. यावेळी नाशिक फाटा-राजगुरुनगर उन्नत मार्गाच्या कामाला गती देण्याची विनंती करण्यात आली.

या प्रकल्पासाठी एकूण १० हेक्टर जमीन आवश्यक असून, त्यापैकी पीएमआरडीए क्षेत्रातील ६.९१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध झाला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील उर्वरित ३.८१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनासाठी पुढील १५ दिवसांत निधी उपलब्ध होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यासंदर्भात नितीन गडकरी यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून सद्यस्थितीची माहिती घेतली तसेच भूसंपादन प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना दिल्या.

दरम्यान, मंचर व कळंब बायपास परिसरातील अपघातप्रवण ठिकाणी अंडरपास आणि सर्व्हिस रोड उभारण्याची मागणीही करण्यात आली. तसेच MSIDC कडे हस्तांतरित करण्यात आलेल्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर, हडपसर-यवत आणि पुणे-शिरूर मार्गांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, या रस्त्यांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची बाब खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिली.



#### निर्णयाकडे नागरिक उत्सुकतेने पाहत

यानंतर गडकरी यांनी MSIDC चे व्यवस्थापकीय संचालक श्री. दीक्षित यांना दूरध्वनीवरून रस्ते दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्याचे सांगण्यात आले. नाशिक फाटा-राजगुरुनगर एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या कामासाठी होणाऱ्या पुढील कार्यवाहीकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाची भूसंपादन प्रक्रिया आणि निविदा प्रत्यक्षात कितपत वेगाने मार्गी लागते, याकडे शिरूर लोकसभा मतदारसंघातील नागरिक उत्सुकतेने पाहत आहेत.

### सल्लागारपदी डॉ. थोरात

■ वडगाव कांदळी (दै. संध्या)

मांडवी किनारा नागरी सहकारी पतसंस्था, ओतूर (ता .जुन्नर) या संस्थेमध्ये सहकारी चळवळीतील अभ्यासू व्यक्तिमत्त्व आणि ग्रामोन्नती मंडळाच्या व्यावसायिक विभागात विभागप्रमुख म्हणून कार्यरत असणारे डॉ. सत्यवान नाथा थोरात यांची तज्ज्ञ सल्लागारपदी निवड झाली असल्याची माहिती मांडवी किनारा पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजीशेठ तांबे यांनी दिली. निर्मलग्राम वडगाव (कांदळी) गावाच्या दृष्टीने ही अत्यंत अभिनंदनीय आणि कौतुकास्पद बाब आहे. डॉ.सत्यवान थोरात हे जुन्नर तालुक्यातील अनेक सहकारी संस्था आणि बँकांना अनेक वर्षे सहकार विषयक मोलाचे मार्गदर्शन करीत आहेत. वार्षिक अहवाल तयार करताना येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाचे नियोजन याबाबत त्यांचा मोठा अभ्यास आहे. सहकारी चळवळ ही ग्रामीण भागातील अर्थवाहिनी असून सभासदांनी कर्ज घेऊन वेळेवर भरणा केल्यास त्यांची पत वाढेल आणि सावकारी पाशातून त्यांची मुक्तता होईल असे विचार तळागाळापर्यंत रुजविण्याचे काम गेली अनेक वर्षे डॉक्टर थोरात हे करीत आहेत.

### देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'वड - पिंपळ - निलगिरी' वृक्ष लागवड

■ कोरेगावमुळ(दै. संध्या)

पूर्व हवेली तालुक्यातील कोरेगावमुळ गावातील उद्योग व्यवसाय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सहकार, कला, क्रीडा, कृषी, वैद्यकीय अशा क्षेत्रात अग्रेसर असणारे तसेच बालाजी नर्सरी उद्योग समूहाचे सर्वेसर्वा सोपान काका शितोळे देशमुख यांचे थोरले चिरंजीव कै.नितीन सोपान शितोळे देशमुख यांच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. समस्त शितोळे देशमुख परिवार अत्यंत दुःख सागरात बुडाला. पै.पाहुणे, भावबंध, स्नेही,आप्तेष्ट, सगेसोयरे, नातेवाईक, मित्रपरिवार यांनी अचानक नितीनच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली. नितीन सदैव स्मितहास्य असणारा आदर्श यशस्वी उद्योजक. समस्त शितोळे देशमुख कुटुंबीयांनी एक ऐतिहासिक निर्णय घेतला कोरेगावमुळ येथील दशक्रियाविधी घाट येथे नदी पात्राच्या बाजूस सर्वांत मोठे 'वड - पिंपळ - निलगिरी' असे वृक्ष लागवड



करुन एक वेगळा संदेश दिला. 'नितीन' आज आमच्यात नाहीस, पण तूझ्या नावानं लावलेले हे रोपटे तुझ्या आठवणीची सावली आम्हाला सदैव देत राहील. 'भावा, तुझ्या स्मृतीप्रित्यर्थ ही हरित भेट जशी तुझी माया, तसेच हे झाड वाढुन पशुपक्षी गुण्यागोविंदाने घरटी बांधून राहू शकतात. या उपक्रमामुळे निसर्गाचे संवर्धन तर होतेच शिवाय त्यांच्या आठवणी जतन करण्याचा छोटासा प्रयत्न केला जातोय.

### नूतन इमारतीत उद्याच्या भारताचे शिल्पकार घडणार : प्राचार्य अभयकुमार साळुंखे

■ पुरंदर (दै. संध्या)

शिक्षण ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया नसून राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करणारी शक्ती आहे. "श्री कातोबा हायस्कूलच्या या नूतन इमारतीत उद्याच्या भारताचे भविष्य घडणार असून, येथून उद्याचे शिल्पकार निर्माण होणार आहेत," असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले.

दिवे येथील श्री कातोबा हायस्कूलच्या नूतन इमारतीचा भूमिपूजन समारंभ नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक, माजी विद्यार्थी व विविध क्षेत्रांतील मान्यवरांना मार्गदर्शन करताना प्राचार्य साळुंखे बोलत होते.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी कृषी राज्यमंत्री व सैनिक कल्याण मंत्री श्री दादासाहेब जाधवराव पुरंदर पंचायत समिती सभापती अमित झेंडे , पुणे जिल्हा परिषद सदस्या रूपाली झेंडे, प्राचार्य राजेंद्र शेजवळ, प्राचार्य सीताराम गवळी, प्राचार्य गुलाबराव बोराटे, विलास पाटील, दिवे गावचे सरपंच रुपेश राऊत, शाळा व्यवस्थापक मंडळ अध्यक्ष गणपतअण्णा शितकल, शोभा दिलीप झेंडे, गुलाबतात्या झेंडे, निलेश झेंडे ,सोपाना टिळेकर, पोलीस पाटील बाळासाहेब झेंडे, शोभा झेंडे, शिवाजी झेंडे ,गंगाराम जाधव, सुधीर झेंडे, प्राचार्य मदन दिवे, प्राचार्य इस्माईल सय्यद, महेशकुमार शिंदे ,प्राचार्य भगवान बेल्हकर, प्राचार्य आडूरकर , वैभव देशमाने सर, ननावरे सर, सोनवणे सर, शेख सर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्रामस्थ, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले की, "मुले म्हणजे उद्याच्या भारताचे भविष्य आहे. या भविष्याला ज्ञानसमृद्ध, विज्ञाननिष्ठ आणि सुसंस्कारी बनविण्यासाठी 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार' हा मंत्र अत्यंत महत्त्वाचा आहे." श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था याच मूल्याधिष्ठित शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. शाळेतील प्रत्येक शिक्षक गुरुदेव मोठ्या निष्ठेने, समर्पणाने आणि सेवाभावाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्याचे माजी कृषी राज्यमंत्री व सैनिक कल्याण मंत्री दादासाहेब जाधवराव म्हणाले विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अशा भक्कम शैक्षणिक वास्तूंची उभारणी अत्यंत महत्त्वाची आहे. सभापती अमित झेंडे म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा आहे.

### माहूर विद्यालयात एड्स जनजागृती कार्यक्रम



■ काळदरी(दै. संध्या)

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचालित माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर ता .पुरंदर जि . पुणे येथे आज विद्यार्थ्यांमध्ये एड्सविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने एड्स जनजागृती व प्रभात फेरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना एचआयव्ही/एड्सची कारणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि समाजातील गैरसमज याबाबत सासवड ग्रामीण रुग्णालय येथील एच. आय. व्ही . तपासणी प्रमुख श्री गोरख शिंगटे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला एड्सविषयक जनजागृतीपर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. एचआयव्हीची लागण कशी होते आणि कशी होत नाही, याबाबत योग्य माहिती देत एड्सग्रस्त व्यक्तींशी भेदभाव न करता त्यांच्याशी संवेदनशीलतेने वागण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी "एड्सपासून बचावासाठी जनजागृती हाच प्रभावी मार्ग" असा संदेश देत जनजागृतीपर उपक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता तसेच सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण झाली.कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री हनुमंत पवार, शिक्षक रामप्रभू पेटकर, महेंद्र भोसले, स्नेहलता टिळेकर, विकास राऊत , इंद्रभान पठारे, लता गायकवाड, त्याचप्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी व इ. ८ वी ते १० वीचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### गायकवाड यांची सावता शेतकरी सेनेच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती

■ कवठे येमाई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य सावता शेतकरी सेना संघटनेच्या प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र राज्य या महत्त्वपूर्ण पदावर शिरूर तालुक्यातील विशाल हरिभाऊ गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



सावता शेतकरी सेनेचे संस्थापक अध्यक्ष मुंजाजी गीरे यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा केली. शेतकरी बांधवांच्या हितासाठी तसेच त्यांच्या विविध प्रश्नांना व अडचणींना न्याय मिळवून देण्यासाठी सावता शेतकरी सेनेच्या ध्येय-धोरणानुसार कार्य करण्याची जबाबदारी विशाल गायकवाड यांच्यावर सोपविण्यात आली आहे. मूळ शिरूर तालुक्यातील कवठे येमाईच्या गांजेवाडी,माळीमळा येथील रहिवासी असलेले विशाल भाऊ गायकवाड यांनी शेतकरी वर्गाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी संघटनेचे कार्य अधिक व्यापक करण्याबरोबरच सावता शेतकरी सेनेचे जाळे राज्यभर विस्तारण्याचे आवाहनही नियुक्तीपत्रातून करण्यात आले आहे. या नियुक्तीबद्दल विशाल गायकवाड यांचे माळीमळा,कवठे येमाई ग्रामस्थ,हितचिंतक,मित्र परिवार यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक व शेतकरी हिताच्या कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत."जय सावता! जय जवान! जय किसान! जय संविधान!" या घोषवाक्यासह शेतकरी हितासाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धार विशाल गायकवाड यांनी बोलताना व्यक्त केला आहे.

# मुख्यमंत्र्यांची इंडस्ट्रियल टाऊनशिप प्रस्ताव करण्याची घोषणा म्हणजे निव्वळ धुळफेक

■ चाकण (दै. संध्या)

मुख्यमंत्र्यांची 'इंडस्ट्रियल टाऊनशिप' प्रस्ताव करण्याची घोषणा म्हणजे निव्वळ धुळफेक आहे. २०१५ चा चाकण व राजगुरूनगर नगरपरिषद प्रस्ताव सह चाकण औद्योगिक नगरी प्राधिकरण प्रस्ताव ११ वर्षे सरकारने का प्रलंबित ठेवला?, आधी त्याचे उत्तर द्या, असा सवाल काँग्रेसचे प्रवक्ते ॲड. निलेश कड यांनी केला आहे.

चाकण आणि पुण्यातील औद्योगिक भागाचे 'इंडस्ट्रियल टाऊनशिप' मध्ये लवकरच रूपांतर करणार," ही मुख्यमंत्र्यांची घोषणा म्हणजे जुन्याच प्रस्तावांची नव्याने केलेली आणि उद्योजकांच्या व स्थानिक जनतेच्या डोळ्यात केलेली निव्वळ धुळफेक आहे. चाकण औद्योगिक क्षेत्रातील उद्योग वाहतूक कोंडीसह पायाभूत विकास रखडला या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात येऊन चाकणबाबत नवीन घोषणांचा पाऊस पाडण्यापूर्वी एका महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आढावा घेऊन सन २०१६ पासून प्रलंबित चाकण नगरपरिषद हद्दवाढ प्रस्ताव सन २०२३ मध्ये पुणे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पाठविला तो का मंजूर करण्यात आला नाही? तसा चाकण आणि राजगुरूनगर नगरपरिषद स्थापनेचा अधिकृत प्रस्ताव गेल्या १० वर्षांपासून मंत्रालयात का प्रलंबित ठेवला? गेले ११ वर्ष चाकण औद्योगिक नगरी प्राधिकरण प्रस्ताव का प्रलंबित आहे? असा थेट सवाल मुंबई उच्च न्यायालयातील मुख्य याचिकाकर्ते ॲड. निलेश कड यांनी उपस्थित केला आहे. सन २०१५ मध्ये पुणे जिल्हाधिकारी सौरभ राव यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार चाकण औद्योगिक नगरीचा रीतसर आणि सकारात्मक प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता, तेंव्हा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून तुम्हीच कार्यभार पाहत होता, मग हा प्रस्ताव कोणाच्या दबावाखाली प्रलंबित ठेवण्यात आला, याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी जनतेला दिले पाहिजे. ॲड. निलेश कड यांनी मुंबई उच्च न्यायालयात (रिट याचिका क्र. ९१९२/२०१४) दिलेल्या प्रदीर्घ कायदेशीर लढ्यानंतर न्यायालयाने 'चाकण औद्योगिक प्राधिकरण' स्थापन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. न्यायालयाच्या आदेशाचा त्यानुसार जिल्हा प्रशासनाच्या प्रस्तावाचा अवमान करून हा प्रस्ताव ११ वर्षे मंत्रालयातील लाल फितीत अडकवून ठेवल्यामुळेच चाकण व राजगुरूनगर क्षेत्राची अवस्था दयनीय झाली आहे. चाकण आणि औद्योगिक परिसरातील रोजची भयंकर वाहतूक कोंडी, खड्डेमय रस्ते आणि नागरी सुविधांच्या अभावामुळे हताश होऊन अनेक उद्योग चाकण सोडून बाहेर जाण्याच्या तयारीत आहेत. तब्बल ११ वर्षांतील आर्थिक आणि रोजगाराच्या नुकसानीची जबाबदारी शासन घेणार का, असा संतप्त सवाल निलेश कड यांनी उपस्थित केला आहे. सरकारने केवळ तोंडी घोषणा हवेत न सोडता, २०१५ च्या मूळ प्रस्तावातील ११ गावांसोबतच, गेल्या ११ वर्षांत नव्याने विस्तारलेला 'चाकण टप्पा क्रमांक ५' हा संपूर्ण परिसर या प्रस्तावित औद्योगिक टाऊनशिपच्या रचनेत समाविष्ट करावा, कारण त्याशिवाय या क्षेत्राचा एकात्मिक विकास होणे अशक्य आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांकडून सन २०१५ मध्ये शासनाला सादर प्रस्ताव सरकारने आता कोणतीही दिरंगाई न करता 'चाकण टप्पा ५' क्षेत्र यात समाविष्ट करुन थेट 'शासन अधिसूचना जारी करावी.

चाकण व राजगुरुनगर नगरपरिषद हद्दवाढीसह आळंदी नगरपरिषद हद्दवाढ प्रस्ताव देखील जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवून तो मंजूर करावा याबाबत मी स्वतः अजितदादा पवार यांना सविस्तर सादरीकरण केले होते. त्यांनी मला हे विषय मार्गी लावतो, असा विश्वास दिला होता.

#### विकास कामांच्या गप्पा नको

चाकण भागात पायाभूत सुविधा कोलमडलेल्या आहेत. जनावरांना चालताना लाज वाटेल असे रस्ते झाले आहेत. नित्याची वाहतूक कोंडी, कचऱ्याच्या समस्येने सर्वांनाच भंडावून सोडले आहे. विकास कामांच्या गप्पा मारण्यापेक्षा नागरिकांची कामे मार्गी लागली पाहिजे.

#### नगरपरिषदांची हद्दवाढ कधी

खेड तालुक्यातील चाकण, आळंदी व राजगुरुनगर नगरपरिषद हद्दवाढ प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून मागून तो मंजूर करण्याची गरज आहे. विकास विकास म्हणता मात्र खेड तालुक्याचा विकास कधी होणार, नगर परिषद हद्दवाढ का थांबली, नागरिक मरणयातना सहन करत आहेत. याला प्रशासन जबाबदार आहे.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

## थोडक्यात पण महत्वाचे

### महाराष्ट्राच्या दुग्ध व्यवसायाची नवी श्वेतक्रांती

मुंबई : हजारो वर्षांपूर्वी मानवाने जंगलातील प्राण्यांना आपल्या सहजीवनाचा भाग बनविले. शेती सुरू झाली, स्थिर वस्ती निर्माण झाली आणि त्याचबरोबर पशुपालनाची संस्कृती विकसित झाली. गाय, म्हैस यांसारखे प्राणी केवळ अन्नाचा स्रोत राहिले नाहीत; ते शेती, दूध, वाहतूक, खत आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आधार बनले. त्या काळातील पशुपालकाला कोणते जनावर अधिक दूध देते, कोणते अधिक ताकदवान आहे किंवा कोणते वातावरणाशी जुळवून घेते, याचा अनुभवातून अंदाज घ्यावा लागत होता. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. पूर्वी पशुपालक अनुभवाच्या आधारे उत्तम जनावर निवडत होता; आज विज्ञान जनावराच्या आनुवंशिक गुणवत्तेचा अभ्यास करून पुढील पिढी कशी असावी, हे ठरविण्याच्या टप्प्यावर पोहोचले आहे. हजारो वर्षांच्या पशुपालन परंपरेने आता प्रयोगशाळेतील अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साथ घेतली आहे. महाराष्ट्रातील दुग्धव्यवसायात लिंग निश्चित वीर्यमात्रा (Sex Sorted Semen-SSS) आणि भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान (Embryo Transfer Technology-ETT/IVF) यांचा वाढता वापर हा याच परिवर्तनाचा नवा अध्याय आहे. भारतीय उपखंडात पशुपालनाची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. सिंधू संस्कृतीच्या काळातही गायी , म्हशी, यांसारखे पशू मानवी जीवनाचा भाग होते. नदीम्हशीच्या पाळीवीकरणाबाबतच्या आनुवंशिक अभ्यासांमध्ये तिचा उगम भारतीय उपखंडाशी जोडला जातो आणि तिच्या पाळीवी करणाची प्रक्रिया सिंधू संस्कृतीच्या उत्तर टप्प्यापूर्वी किंवा त्या आसपास सुरू झाल्याचे संकेत मिळतात.

### दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती आता घरबसल्या

पुणे : नोंदणीकृत दस्तऐवज, सूची क्रमांक २ आणि विवाह प्रमाणपत्रांच्या डिजिटल स्वाक्षरीयुक्त प्रमाणित प्रती नागरिकांना घरबसल्या ऑनलाइन उपलब्ध करून देणाऱ्या ‘ई-प्रमाण’ (e-Pramaan) प्रकल्पाचाराज्यव्यापीशुभारंभमहसूलमंत्रीचंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यासोबतच नोंदणी अभिलेखांचे डिजिटायझेशन आणि नोंदणी व मुद्रांक विभागातील अधिसूचित सेवांचे सुलभीकरण या दोन महत्त्वपूर्ण उपक्रमांचाही शुभारंभ करण्यात आला.यावेळी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे, जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल, सहकार आयुक्त दीपक तावरे, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक मंजिरी मनोलकर आणि सहनोंदणी महानिरीक्षक राजेंद्र मुठे उपस्थित होते. ‘ई-प्रमाण’ प्रकल्पामुळे नागरिकांना नोंदणीकृत दस्तऐवज, सूची क्रमांक २ तसेच विवाह प्रमाणपत्रांच्या डिजिटल स्वाक्षरीयुक्त प्रमाणित प्रती ऑनलाइन मिळणार आहेत. या प्रमाणित प्रती एसएमएस लिंक किंवा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून घरबसल्या प्राप्त करता येणार आहेत. डिजिटल स्वाक्षरी आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आल्याने या प्रती विश्वासार्ह, सुरक्षित आणि छेडछाडमुक्त राहणार आहेत.

### गणेशोत्सव मंडळांनी जनजागृतीचे केंद्र बनावे

मुंबई : महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून बाल हक्क, बाल संरक्षण तसेच बालकांशी संबंधित कायदे व यंत्रणांबाबत व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गणेशोत्सव मंडळांना केले आहे. बालकांना शिक्षण, सुरक्षितता, सन्मानाने जगणे आणि शोषणापासून संरक्षणाचा हक्क आहे. बाल लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अधिनियम, बालविवाह प्रतिबंधक कायदा, बालमजुरी, बाल तस्करी तसेच बालकांवरील अत्याचार व शोषण याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी गणेशोत्सव मंडळांनी पुढाकार घ्यावा, असे आयोगाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे म्हटले आहे. गणेशोत्सव मंडळांनी मंडप परिसरात बाल हक्क व बाल संरक्षण विषयक फलक, पोस्टर्स, बॅनर्स, एलईडी संदेश तसेच माहितीपत्रके लावावीत व वितरित करावीत. बालकांशी संबंधित कोणतीही अनुचित घटना निदर्शनास आल्यास संबंधित यंत्रणेशी तातडीने संपर्क साधण्याबाबत नागरिकांना माहिती द्यावी.या जनजागृती उपक्रमांतर्गत बाल कल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, विशेष बाल पोलीस पथक, बाल हेल्पलाइन, बाल संरक्षण सेवा तसेच महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या ‘चिराग’ ॲप आणि तक्रार निवारण व्यवस्थेबाबतची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गणेशोत्सव काळात बालकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी निबंध लेखन, चित्रकला, पोस्टर मेकिंग, घोषवाक्य लेखन, वक्तृत्व तसेच बाल हक्क विषयक जनजागृतीपर उपक्रम आयोजित करण्याचे आवाहनही गणेशोत्सव मंडळांना करण्यात आले आहे.



# महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने वाटचाल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन : स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला भारताच्या प्रगतीचा आणि महाराष्ट्राच्या विकासाचा गौरव

■ मुंबई (दै. संध्या)

भारताची जागतिक नेतृत्वाच्या दिशेने तर महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबईतील ताज हॉटेल येथे आयोजित स्वागत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित राजनैतिक अधिकारी, वाणिज्यदूत, विविध देशांचे प्रतिनिधी आणि मान्यवरांचे स्वागत केले. भारताची प्रगती, महाराष्ट्राची आर्थिक ताकद आणि भविष्यातील विकासदृष्टी यांचा यावेळी त्यांनी आढावा घेतला.

मुख्यमंत्री यांच्या पत्नी अमृता फडणवीस, विविध देशांचे महावाणिज्य दूत, कौन्सुलर कॉर्प्सचे डीन आणि पोलंडचे महावाणिज्य दूत थॉमस, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मंत्री छगन भुजबळ, मंगलप्रभात लोढा, आदिती तटकरे, राज्यमंत्री योगेश कदम, महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारत ही जगातील सर्वात प्राचीन आणि वैविध्यपूर्ण संस्कृतींपैकी एक असून समावेशकता, सहिष्णुता आणि विविध विचारांचा स्वीकार ही देशाची वैशिष्ट्ये आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आज अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि जागतिक घडामोडींमध्ये निर्णायक भूमिका बजावणारा देश म्हणून उदयास येत आहे. जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारताने स्थान प्राप्त केले असून लवकरच पाच ट्रिलियन डॉलर्सपेक्षा मोठ्या अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या दशकात भारताने गरिबी निर्मूलन, पायाभूत सुविधा विकास, नवकल्पना, तंत्रज्ञान आणि मानव संसाधन निर्मिती या क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. भारतीय प्रतिभेने केवळ देशातीलच नव्हे तर जागतिक उद्योगविश्वालाही दिशा दिली आहे. हा नवा भारत विकासाचे नवे मानदंड निर्माण करीत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

महाराष्ट्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेचे शक्तिकेंद्र असल्याचे सांगताना त्यांनी राज्याची औद्योगिक, तांत्रिक आणि नवोन्मेष क्षेत्रातील आघाडी अधोरेखित केली. महाराष्ट्र हा देशाचा उत्पादन क्षेत्रातील अग्रणी प्रदेश, तंत्रज्ञान केंद्र, स्टार्टअपची राजधानी आणि गुंतवणुकीचे प्रमुख आकर्षण केंद्र असल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबई ही केवळ आर्थिक, व्यावसायिक आणि मनोरंजन क्षेत्राची राजधानी नसून जागतिक गुंतवणूक आकर्षित करणारे महत्वाचे केंद्र बनत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई आणि नवी मुंबई परिसर देशाची डेटा सेंटर राजधानी म्हणूनही उदयास येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यात उभारण्यात येत असलेल्या वाढवण बंदराचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारताच्या सागरी सामर्थ्याला नवी दिशा देणारा हा प्रकल्प ठरणार आहे. सध्या देशातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू बंदरापेक्षा हे बंदर तीनपट मोठे असेल आणि जगातील अव्वल दहा बंदरांमध्ये त्याचा समावेश होईल.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात विकसित होत असलेल्या ‘तिसऱ्या मुंबई’ची संकल्पना आता प्रत्यक्षात आकार घेत असल्याचे त्यांनी सांगितले. एज्युकेशन सिटी, मेडी सिटी, इनोव्हेशन सिटी, स्पोर्ट्स सिटी, जीसीसी सिटी आणि नव्या व्यावसायिक जिल्ह्यांच्या माध्यमातून जागतिक दर्जाची शहरी परिसंस्था निर्माण केली जात आहे. तसेच वाढवण बंदर ते विरार या परिसरात ‘चौथी मुंबई’ विकसित करण्याची संकल्पना पुढे नेण्यात येत असून देशातील पहिले ऑफशोअर विमानतळ आणि मुंबई महानगर क्षेत्रातील तिसरे विमानतळ पालघर जिल्ह्यात उभारण्याची राज्याची महत्वाकांक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात विविध औद्योगिक क्लस्टर्स विकसित करण्यात येत असून मुंबई, पुणे आणि मुंबई महानगर प्रदेशासोबतच छत्रपती संभाजीनगर, नागपूर, चंद्रपूर, नाशिक आणि अहिल्यानगर ही नवी विकासकेंद्रे म्हणून उदयास येत आहेत. संरक्षण, विमानवाहतूक, स्वच्छ ऊर्जा, कंप्रेस्ड बायोगॅस आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

राजनैतिक समुदाय आणि विविध देशांच्या वाणिज्यदूत कार्यालयांनी महाराष्ट्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली असल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांचे विशेष आभार मानले.

### भारत-महाराष्ट्राच्या विकास प्रवासात राजनैतिक समुदाय महत्त्वाचा भागीदार

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीने विविध भाषा, धर्म, संस्कृती आणि प्रदेशांना एका सूत्रात बांधत लोकशाही, समता आणि न्यायाची मूल्ये रुजविली असून, भारताचे संविधान ही त्या प्रवासाची सर्वोत्तम अभिव्यक्ती असल्याचे प्रतिपादन राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केले. भारत आणि महाराष्ट्राच्या विकासाच्या प्रवासात राजनैतिक समुदाय महत्त्वाचा भागीदार असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ‘विकसित भारत’ संकल्पनेमुळे भारत जागतिक स्तरावर अधिक आत्मविश्वासाने पुढे जात असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक, औद्योगिक, वित्तीय आणि नवोन्मेष क्षेत्रातील अग्रगण्य राज्य म्हणून अधिक बळकट होत असल्याचेही त्यांनी सांगितले. मुंबईतील वाढत्या राजनैतिक उपस्थितीमुळे महाराष्ट्राविषयी जगाचा वाढता विश्वास अधोरेखित होत असून व्यापार, गुंतवणूक, पर्यटन, शिक्षण, तंत्रज्ञान, संशोधन, स्टार्टअप, कृषी आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रांतील सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही मंत्री रावल यांनी दिली. भारत आणि विविध देशांमधील मैत्री व सहकार्य अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### भारताची प्रगती जगासाठी प्रेरणादायी

भारताच्या स्वातंत्र्य दिनाचा उत्सव हा देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील दूरदृष्टी, धैर्य आणि त्यागाची आठवण करून देणारा असून एकता, विविधता, लोकशाही आणि प्रगती या मूल्यांचा गौरव करणारा असल्याचे मत कौन्सुलर कॉर्प्सचे डेप्युटी डीन तथा पोलंडचे महावाणिज्य दूत थॉमस यांनी व्यक्त केले. भारताने स्वातंत्र्यानंतर केलेली उल्लेखनीय प्रगती आणि जागतिक स्तरावरील वाढता सहभाग हा जगासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. भारत आणि विविध देशांमधील मैत्री व सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी कौन्सुलर कॉर्प्सला योगदान देण्याची संधी मिळत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. या विशेष प्रसंगी राजनैतिक समुदायाला एकत्र आणल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. भारतातील नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देताना भारताने जागतिक पटलावर अधिकाधिक प्रगती करावी आणि उज्ज्वल यश संपादन करावे, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविकात राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ. राजेश गवांदे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. राज्याच्या आर्थिक सामर्थ्यामुळे महाराष्ट्र देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत असल्याचे सांगून त्यांनी देशाच्या आणि महाराष्ट्राच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रातील प्रगतीची माहिती देणारी ध्वनिचित्रफित दाखविण्यात आली.

# जलसंपदा विभागाला २०२९ पर्यंत आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याचे लक्ष्य

■ मुंबई (दै. संध्या)

जलसंपदा विभाग अधिक सक्षम, आधुनिक आणि लोककेंद्री करण्यासाठी २०२९ पर्यंत विभागांतर्गत महामंडळांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जलसंपदा विभागाचा केंद्रबिंदू शेतकरी आणि नागरिक असला पाहिजे. शेतीचे संरक्षण करतानाच शहरांची आणि उद्योगांची पाण्याची गरज भागविण्यासाठी शाश्वत जलनियोजन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २१व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील वरळी येथील एनएससीआय डोममधील ‘द पॅलेस हॉल’ येथे आयोजित परिसंवाद व कार्यशाळेच्या समारोप सत्रात ते बोलत होते. यावेळी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्वेताली ठाकरे, प्राधिकरणाचे आजी-माजी सदस्य, जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच राज्यातील विविध जलविकास संस्थांचे अधिकारी उपस्थित होते. जलसंपदा विभागासमोर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठेवलेल्या विकासाच्या आराखड्यानुसार काम करणे आवश्यक आहे. ‘विकसित महाराष्ट्र २०४७’चे उद्दिष्ट साध्य करताना शेती व्यवसायाला बाधा न आणता त्याचे संरक्षण करतच शहर आणि उद्योगांसाठी पाण्याचे नियोजन करावे लागेल.

### उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे धोरण

धरणांमध्ये उपलब्ध पाण्याचे प्रमाण लक्षात घेऊन पीक पद्धती व लागवडीचे नियोजन करण्यासाठी कृषी आणि जलसंपदा विभागांनी एकत्रितपणे काम करावे. उपलब्ध पाण्याच्या क्षमतेनुसार पिकांची निवड केल्यास शेती अधिक बागायती, उत्पादनक्षम आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. जलसंपदा विभागाने राज्याच्या हितासाठी पर्यटन आणि फ्लोटिंग सोलर यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. या माध्यमातून विभागाच्या मालमत्तेचा आणि जलसाठ्यांचा बहुउद्देशीय वापर करताना त्यातून निर्माण होणारे आर्थिक स्रोत जलप्रकल्पांच्या विकासासाठी उपयोगात आणण्याचे प्रयत्न व्हावेत, असे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे काम अत्यंत संवेदनशील असून, प्राधिकरणाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा व्यापक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय परिणाम लक्षात घेणे आवश्यक आहे. ‘कोणाला काय वाटते’ यापेक्षा निर्णयाची व्याप्ती, त्याचे संभाव्य परिणाम आणि क्षेत्रीय वास्तव लक्षात घेऊन काम झाले पाहिजे, असे मंत्री विखे-पाटील यांनी स्पष्ट केले. जलक्षेत्रातील स्थानिक समस्या आणि क्षेत्रीय विषमता समजून घेण्यासाठी नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर यांसह राज्यातील विविध भागांत प्रादेशिक कार्यशाळा आयोजित करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. अशा कार्यशाळांमधून शेतकरी, अधिकारी आणि संबंधित घटकांचे प्रश्न प्रत्यक्ष जाणून घेऊन स्थानिक गरजांनुसार उपाययोजना करणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

# ‘हर घर तिरंगा’ अभियानानिमित्त तिरंगा रॅली

■ नवी दिल्ली(दै. संध्या)

येथील महाराष्ट्र सदनात ‘हर घर तिरंगा’ अभियानाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. यानिमित्ताने महाराष्ट्र सदन परिसरात तिरंगा रॅली काढण्यात आली.

महाराष्ट्र सदनच्या नवी दिल्लीतील निवासी आयुक्त तथा सचिव डॉ. श्वेता सिंघल यांच्या हस्ते या रॅलीला प्रारंभ झाला. महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहाय्यक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक लेखा अधिकारी निलेश केदारे, महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते, सुरक्षा अधिकारी अनिल चोरगे आदींसह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.



# गटशेती, ‘एआय’ आणि शाश्वत शेतीचा रोडमॅप

■ मुंबई (दै. संध्या)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात ‘सत्यमेव जयते फार्मर कप २०२६’ या महत्वाकांक्षी उपक्रमावरील विशेष मुलाखतीचा दुसरा भाग प्रसारित करण्यात येणार आहे. या भागात पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी उपक्रमाच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचे पैलू, गटशेतीची यशस्वी मॉडेल्स आणि राज्यातील शेतीच्या भविष्यासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सविस्तर माहिती दिली आहे.

‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात या विशेष मुलाखतीचा दुसरा भाग मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित करण्यात येणार आहे.

# अनधिकृत बांधकामांवर तातडीने कारवाई करा : अण्णा बनसोडे

■ मुंबई (दै. संध्या)

कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील विनापरवाना व अनधिकृत बांधकामांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी. या कारवाईत दिरंगाई किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी, असे निर्देश महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले. तसेच अनधिकृत बांधकामांबाबतची संपूर्ण वस्तुस्थिती आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल २८ ते २९ ऑगस्टपर्यंत सादर करावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

विनापरवाना व अनधिकृत बांधकामांवर कायदेशीर कारवाई करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ व दुर्लक्ष करणाऱ्या कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील दालनात बैठक झाली. यावेळी कोल्हापूरचे जिल्हाधिकारी तसेच कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील वळीवडे, उंचगाव, गांधीनगर, चिंचवाड आणि मुडशिंगी या गावांमधील विनापरवाना बांधकामांबाबत प्राप्त तक्रारींची बैठकीत सविस्तर माहिती घेण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### मुढाळे येथे महिलांसाठी शेतीशाळा संपन्न

बारामती : दैनिक संध्या

पिकांची लागवड ते काढणी पर्यंतची सर्व माहिती देण्यासाठी मौजे मुढाळे येथे बळीराजा नैसर्गिक शेतकरी गटामधील महिला शेतकऱ्यांकरिता मका पिकाच्या शेतीशाळा वर्गाचे आयोजन करण्यात आले. मागील दोन महिन्यांपासून मका पिकांच्या शेती शाळा वर्गांचे आयोजन करण्यात येत असून आत्तापर्यंत तीन वर्ग पूर्ण झाले आहेत. या शेतीशाळेमध्ये मका पिकातील लष्करी अळीचे नियंत्रण करण्याकरिता दशपर्णी अर्क निर्मिती याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. महिला शेतकऱ्यांनी यावेळी दशपर्णी अर्क निर्मिती घरीच करून अल्प किमतीत उत्कृष्ट असे कीटकनाशक तयार करून तो वापरण्याचा निर्धार केला. कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुरज मडके, बारामतीचे तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी मार्गदर्शन केले. शेतीशाळेला ज्योती दरेकर, सहायक कृषी अधिकारी आरती कांबळे,तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक विश्वजीत मगर, सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री गणेश जाधव उपस्थित होते.

### दुसऱ्याशी प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून पत्नीचा खून; पतीनेही घेतला गळफास

चाकण : दैनिक संध्या

■ खेड तालुक्यातील कुरुळी येथील घटना

दुसऱ्याशी प्रेम असल्याच्या संशयावरून पतीने पत्नीचा झोपेतच गळा आवळून खून केल्याचा धक्कादायक प्रकार खेड तालुक्यातील कुरूळी गावच्या हद्दीतील एका भाड्याच्या खोलीत घडला. त्या नंतर पतीनेही स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. गुरुवारी (दि.१३) रात्री उशिरा दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. प्रियंका महादेव इगवे ( वय - ३० ) असे खून झालेल्या विवाहितेचे नाव आहे. तर महादेव मारुती इगवे (वय - ३५, सध्या रा. कुरुळी, ता. खेड, मूळ रा. केज, ता. बीड) असे गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या पतीचे नाव आहे. अधिक माहिती अशी की, मृत दांपत्य हे मूळचे बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील रहिवासी असून, ते मजूर आहेत. तसेच ज्याच्याशी या मयत विवाहितेचे प्रेमसबंध होते. तोही मजूरच आहे. मयत प्रियंका हिचे निलेश दिलीप कांबळे याच्यासोबत प्रेमसंबंध असल्याची माहिती तिचा पती महादेव याला कळाली होती. त्यावरून त्याने गुरुवारी रात्री उशीरा झोपेत असलेल्या पत्नी प्रियंकाचा गळा आवळून खून केला. नंतर स्वताही गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार सकाळी उघडकीस येताच कुरुळीत मोठी खळबळ उडाली. मृत प्रियंकाचे वडील बंडू आत्माराम धुमाळ (वय ५८ वर्षे, रा. शिवणी, ता. बीड, जि. बीड) यांनी याप्रकरणी दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून महादेव इगवे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राम पिंजारी हे याप्रकरणी अधिक करत आहेत.



### ज्ञानेश्वर बालक मंदिरातील २०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

आळंदी देवाची : दैनिक संध्या

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर बालक मंदिरातील विद्यार्थ्यांना पुष्पक स्टील, अल्का ग्रुपच्या कटारिया परिवाराच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी २०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, स्केच पेन व रंगीत खडूचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. मुख्याध्यापक प्रदीप काळे यांनी प्रास्ताविकात कटारिया परिवाराच्या दातृत्वाची तसेच संस्थेला यापूर्वी केलेल्या मदतीची माहिती देत उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. रूषभ राजेश कटारिया यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शैक्षणिक प्रगतीसाठी प्रोत्साहन दिले. यावेळी संस्था अध्यक्ष सुरेश वडगावकर, सचिव अजित वडगावकर, जैन स्थानकवासी संघ आळंदी देवाचीचे विश्वस्त सागर बागमार, मुख्याध्यापक प्रदीप काळे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वर्षा काळे, प्रतिभा भालेराव, गजानन राठोड, गीतांजली मोरस्कर, सारिका कुटे, सारिका शिंदे, रूपाली उंबरकर व अर्चना रंधवे यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन व आभार राहुल चव्हाण यांनी मानले.

### विहिरीच्या पाण्यात अडकलेल्या निष्पाप बछड्याचे वाचले प्राण

नारायणगाव : दैनिक संध्या



जुन्नर तालुक्यातील आळे येथील खटकाळी मळा, गव्हाळी बाबा येथील गावकरी अमोल कुऱ्हाडे यांच्या विहिरीत बिबट्याचा बछडा पडल्याची घटना बुधवारी दि.१२ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली. बछडा विहिरीत पडल्याचे समजताच परिसरात एकच खळबळ उडाली.विहिरीतील पाण्यात पडल्यामुळे या बछड्याचा जीव धोक्यात आला होता.गावकऱ्यांनी तातडीने याची माहिती वन्यजीव निसर्ग संवर्धन संस्था आणि वनविभागाला दिली. घटनेची माहिती मिळताच वन्यजीव निसर्ग संवर्धन बचाव पथक, जुन्नरचे आकाश माळी, ऋषी वावळ आणि वनविभागाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. बछडा पाण्यात बराच वेळ पोहत असल्यामुळे तो पूर्णपणे दमला होता आणि त्याला बाहेर निघण्यासाठी कशाचातरी आधार हवा होता.परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बचाव पथकाने अत्यंत काळजीपूर्वक आणि सुरक्षितपणे बचावकार्य सुरू केले.कोणताही धोका निर्माण होणार नाही याची खबरदारी घेत त्यांनी एक पेटी विहिरीत सोडली. दमलेला बछडा सुरक्षितपणे त्या पेटीत आला. त्यानंतर पथकाने त्याला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढले. बछडा बऱ्याच वेळ पाण्यात राहिल्याने त्याची वैद्यकीय तपासणी करणे गरजेचे होते. त्यामुळे त्याला पुढील उपचार आणि वैद्यकीय निरीक्षणाखाली ठेवण्यासाठी माणिकडोह बिबट निवारण केंद्रात हलविण्यात आले आहे. वनविभाग आणि बचाव पथकाच्या सतर्कतेमुळे या निष्पाप बछड्याचे प्राण वाचले आहेत.

# राहुल गांधी यांचा पुण्यात ‘छात्रो की गुंज’ कार्यक्रम

■ पुणे (दै. संध्या)

‘छात्रो की गुंज’ या कार्यक्रमासाठी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी पुण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राहुल गांधी यांच्या ‘छात्रो की गुंज’ या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक बैजुजी, मनोज त्यागी, महिला अध्यक्षा संध्या सव्वालाखे, माजी मंत्री डॉ. विश्वजीत कदम, येशामती ठाकुर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष रमेश बागवे, मोहन जोशी, बाबु नायर, सुनिल मलके, पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाचे अध्यक्ष दीप्ती चवधरी, पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप, जिल्हाध्यक्ष लहुअण्णा निंवगुणे, गटनेते चंदूशेठ कदम व पदाधिकार, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे



प्रास्ताविक पश्चिम विभागाच्या अध्यक्ष दीप्ती चवधरी यांनी केले. यानंतर पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आपल्या कार्यक्रमासंदर्भात सूचना मांडल्या. यानंतर कार्यक्रमाचे स्वरूप सांगताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, “पुण्यात पहिल्यांदाच महिला विद्यार्थीनींशी संवाद लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुली गांधी करणार आहे. पुणे हे विद्येचे माहेरघर असून संपूर्ण देशातून विद्यार्थी विविध महाविद्यालय व विद्यापीठात शिक्षण घ्यायला येतात. विद्यार्थ्यांचे अनेक ज्वलंत प्रश्न आहेत. त्यांचे प्रश्न सोडविण्यास केंद्र सरकार अपयशी ठरले आहे. विद्यार्थी आपल्या हक्कांसाठी आंदोलन करतात. नीट पेपरफूटीमुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले आहे आणि त्याचा मुख्य केंद्रबिंदू पुण्यात होता. राहुलजी गांधी महिला विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न जाणून घेवून त्यांना त्यांच्या भवितव्यासाठी जो विषय महत्वाचा असेल ते सरकार पुढे मांडत आहेत. त्यांनी अनेक ठिकाणी ‘छात्रो की गुंज’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बाबत आपले विचार मांडले आहेत. सर्व काँग्रेसचे नेते, पदाधिकारी, नगरसेवक, फ्रंटल संघटना, सेल, व कार्यकर्त्यांनी एकजूटीने काम करून राहुल गांधी यांचा ‘छात्रो की गुंज’ हा कार्यक्रम यशस्वी करावा.” उपस्थित पुणे शहरातील काँग्रेस नेते, पदाधिकारी, नगरसेवक यांनी कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून आपापल्या सूचना मांडल्या.

## श्रीक्षेत्र जेजुरीगड परिसरात देशी वृक्ष लागवड व संवर्धन अभियानाचा शुभारंभ

### पाच हजार वृक्षांची करणार लागवड

■ जेजुरी (दै. संध्या)

श्री. मार्तंड देवसंस्थान, जेजुरी आणि वन विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीक्षेत्र जेजुरी येथे पाच हजार देशी वृक्ष लागवड व संवर्धन अभियानाचा शुभारंभ श्रावण महिन्याच्या प्रारंभी करण्यात आला. या अभियानाचा शुभारंभ श्री. मार्तंड देवसंस्थानचे अध्यक्ष ॲड. विश्वास पानसे यांच्या हस्ते करण्यात आला. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे जतन तसेच स्थानिक प्रजातींच्या देशी वृक्षांचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत श्रीक्षेत्र जेजुरी परिसरात मोठ्या प्रमाणावर देशी वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन व संवर्धन करण्यावर भर देण्यात येणार आहे. धार्मिक पर्यटनाबरोबरच जेजुरी परिसर अधिक हरित व पर्यावरणपूरक करण्यासाठी हा



उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी वन परिक्षेत्र अधिकारी सागर ढोले, वन परिमंडळ अधिकारी दीपाली शिंदे, धनंजय देवकर तसेच मार्तंड देवसंस्थान आणि वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पर्यावरण रक्षणाची जबाबदारी केवळ शासकीय यंत्रणांची नसून समाजातील प्रत्येक घटकाची आहे. त्यामुळे या अभियानात नागरिकांनीही सहभागी होऊन देशी वृक्षांची लागवड, संगोपन व संवर्धन करण्याचे आवाहन यावेळी देवसंस्थानच्या वतीने करण्यात आले.

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांना ‘उत्कृष्ट सेवा पदक’

### दीर्घकालीन, निष्कलंक आणि गुणवत्तापूर्ण पोलीस सेवेला महाराष्ट्र शासनाकडून सन्मान

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र पोलीस दलामध्ये दीर्घकालीन, निष्कलंक आणि उल्लेखनीय सेवा बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यात येतो. भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट २०२६ रोजी येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांना महाराष्ट्र पोलीस दलातील उल्लेखनीय, गुणवत्तापूर्ण आणि उत्कृष्ट सेवेबद्दल ‘उत्कृष्ट सेवा पदक’ जाहीर करण्यात आले आहे.



वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी आपल्या पोलीस सेवाकाळात कर्तव्यनिष्ठा, शिस्त, प्रामाणिकपणा आणि कार्यक्षमतेला प्राधान्य देत विविध जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांनी केलेल्या कामाची दखल घेण्यात आली आहे. पोलीस अधिकारी म्हणून कर्तव्य बजावताना गुन्हेगारीवर नियंत्रण, नागरिकांशी समन्वय, संवेदनशील प्रकरणांमध्ये तत्पर कार्यवाही तसेच पोलीस दलाची प्रतिमा अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय ठरले आहेत. त्यांच्या दीर्घकालीन आणि निष्कलंक सेवेला मिळालेला हा सन्मान त्यांच्या कार्याचा गौरव मानला जात आहे.

‘उत्कृष्ट सेवा पदक’ हा सन्मान केवळ एका अधिकाऱ्याच्या कामगिरीचा गौरव नसून, कर्तव्य बजावताना प्रामाणिकपणा, निष्ठा आणि सेवाभाव जपणाऱ्या पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. उमेश गित्ते यांच्या या सन्मानामुळे येरवडा पोलीस ठाण्यासह पुणे पोलीस दलातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मिळालेल्या या प्रतिष्ठेच्या सन्मानाबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील सेवाकार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## महाराष्ट्र-काश्मीर फलोत्पादन सहकार्याने शेतकऱ्यांच्या विकासाला वेग

■ नारायणगाव (दै. संध्या)

महाराष्ट्रातील आधुनिक, व्यावसायिक फलोत्पादन तंत्रज्ञान व जम्मू-काश्मीरमधील समशीतोष्ण फळपिकांचे प्रगत तंत्रज्ञान यांची परस्पर देवाणघेवाण करून दोन्ही राज्यांतील शेतकऱ्यांच्या विकासाला चालना देण्याचा निर्णय क्रालबाग ,जम्मू काश्मीर येथे 10 ऑगस्ट 2026 रोजी द्राक्ष दिना निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात घेण्यात आला. यामुळे महाराष्ट्र व काश्मीर कृषी तंत्रज्ञान देवाणघेवाणीला नवी दिशा मिळणार आहे. अशी माहिती नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष अनिल मेहेर यांनी दिली.

गांदरबल येथील कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने क्रालबाग येथे द्राक्ष दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नारायणगाव ग्रामोन्नती मंडळ कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष,कृषिरत्न अनिल मेहेर यांनी जम्मू-काश्मीरमधील शेतकऱ्यांना द्राक्ष लागवडीचे आधुनिक तंत्रज्ञान, विविध जाती, ग्रेडिंग, पॅकिंग निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी कृषिरत्न अनिल मेहेर यांनी शेर-ए-काश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठ, श्रीनगर येथे भेट दिली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नजीर अहमद गनाई, विविध विभागांचे प्रमुख आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी कृषी तंत्रज्ञान देवाण-



घेवाण, प्रशिक्षण आणि संशोधनाच्या विविध बाबींवर चर्चा केली.यावेळी ग्रामोन्नती मंडळाच्या विश्वस्त मोनिका मेहेर,नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. राहुल घाडगे उपस्थित होते.

कृषिरत्न अनिल मेहेर यांनी महाराष्ट्रातील द्राक्ष उत्पादनातील दीर्घ अनुभवाच्या आधारे वैज्ञानिक द्राक्ष उत्पादन,वाय -ट्रेनिंग पद्धती, द्राक्ष कॅनोपी व्यवस्थापन, उच्च घनता लागवड, मृदा व पान ऊतक परीक्षण, सेंद्रिय कर्ब वाढ, जैवखते, जैविक कीडनाशके, एकात्मिक कीड-रोग व्यवस्थापन, गॅप आधारित उत्पादन, ठिबक सिंचन व फर्टिगेशन याबाबत माहिती दिली.यावेळी संरक्षित शेती, काढणीपश्चात तंत्रज्ञान, पॅकहाऊस, कोल्डचेन, मूल्यवर्धन, ब्रँडिंग व बाजारपेठ जोडणी यांसारख्या तंत्रज्ञानाचा जम्मू-काश्मीरमध्ये अवलंब करण्याबाबत चर्चा झाली. याबरोबरच जम्मू-काश्मीरमधील सफरचंद, अक्रोड, चेरी व इतर समशीतोष्ण फलोत्पादन पिकांचे तंत्रज्ञान व उत्पादन ज्ञान महाराष्ट्रात हस्तांतरित करण्याच्या संधींचाही आढावा घेण्यात आला.

दोन राज्यातील सहकार्यामुळे संयुक्त प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि संशोधन-विस्तार दुवा मजबूत होण्यास मदत होणार असून, महाराष्ट्र व जम्मू-काश्मीरमधील फलोत्पादन क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.असे मत या वेळी दोन्ही राज्यातील तज्ञांनी व्यक्त केले. कृषिरत्न अनिल मेहेर अध्यक्ष, कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव यांचा महाराष्ट्रातील द्राक्ष बागा आणि काश्मीरच्या फळबागांना ज्ञानाच्या शेतीने जोडत शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी नवी भागीदारी उभारण्याचा हा प्रयत्न आहे.

## विद्याव्हॅली प्रशालेत हर घर तिरंगा रॅलीद्वारे देशभक्तीचा जागर



■ चाकण (दै. संध्या)

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना वृद्धिंगत व्हावी आणि ‘हर घर तिरंगा’ अभियानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने चाकण येथील एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेच्या विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल प्रशालेच्या वतीने ‘हर घर तिरंगा’ रॅली द्वारे देशभक्तीचा जागर करण्यात आला. एस.पी. देशमुख शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शामराव देशमुख, सचिव डॉ. रोहिणी देशमुख, प्राचार्या स्वाती रणदिवे यांच्या हस्ते या जनजागरण रॅलीचा मोठ्या दिमाखात शुभारंभ करण्यात आला. रॅलीच्या माध्यमातून चाकण पंचक्रोशीतील राक्षेवाडी, आगरकरवाडी, काळूस गावातील नागरिकांमध्ये ‘हर घर तिरंगा’ अभियानाबाबत जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन देशभक्तिपर घोषणा देत परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात परिसर दणाणून सोडला. नागरिकांना तिरंग्याचे वाटप करत देशभक्तीचा जागर करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेली देशभक्तिपर घोषवाक्य, नामफलक, विविध संदेश नागरिकांना आपल्या घरांवर तिरंगा फडकवून देशाप्रती असलेला अभिमान व्यक्त करण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि नागरिकत्वाची जाणीव रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यालयाच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले, असल्याचे श्यामराव देशमुख, रोहिणी देशमुख, स्वाती रणदिवे व मोनाली नलावडे यांनी सांगितले.

# कला केंद्रात गोळीबार करणाऱ्या हल्लेखोरास अटक

### महागडे पिस्तूल जप्त

■ चाकण (दै. संध्या)

पिंपरी - चिंचवड पोलिसांच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने नारायणगाव मधील गोळीबार प्रकरणातील हल्लेखोराला खेड तालुक्यातील चाकण जवळील रोहकल फाटा येथून जेरबंद केले. आरोपीकडून ५० हजार रुपये किमतीचे १ देशी बनावटीचे लोखंडी पिस्तूल जप्त करण्यात आले आहे.

पुणे ग्रामीण हद्दीतील नारायणगाव येथे किरकोळ कारणावरून गोळीबार करून खुनाचा प्रयत्न करणाऱ्या गुन्ह्यातील मुख्य फरारी आरोपीला पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले आहे. अविनाश लक्ष्मण कोळेकर (वय ३०, रा. हनुमानवाडी, चाकण रोड, आळंदी,



ता.खेड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून ५० हजार रुपये किमतीचे एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्तूल जप्त करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि. ८ ) नारायणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका कलाकेंद्रावर किरकोळ कारणावरून दोन गटांत वाद झाला होता. या वादातून एका गटाने गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी नारायणगाव पोलीस ठाण्यात चार अनोळखी आरोपींविरुद्ध भा.न्या.सं. आणि शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यातील आरोपी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वावरत असल्याची गोपनीय माहिती मालमत्ता गुन्हे विरोधी पथकातील पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने मंगळवारी (दि.११ ऑगस्ट ) रोहकल फाटा, चाकण येथून आरोपी अविनाश कोळेकर याला सापळा रचून ताब्यात घेतले.

आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ५० हजार रुपये किंमतीचे देशी बनावटीचे १ लोखंडी पिस्तूल मिळून आले. आरोपीविरुद्ध उत्तर चाकण पोलीस ठाण्यात शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुढील कारवाईसाठी त्याला नारायणगाव पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. आरोपी कोळेकर याच्यावर यापूर्वी आळंदी पोलीस ठाण्यात व जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.